RNI : MAHMAR/2022/88796

www.vidarbhkesari.com | Vidabh Kesari News | 90969 45629 | @vidarbhkesari

vidarbhkesari21@gmail.com

दैनिक

# विदर्भ केसरी

विदर्भाचा मानबिंदू

मुख्य संपादक : अमोल कंटाळे

www.vidarbhkesari.com

अमरावती

२५ बुधवार फेब्रुवारी २०२६

✽ वर्ष ५ ✽ अंक २७१

✽ पृष्ठ : ६ ✽ मूल्य रु : ३

सुवर्ण संधी! सुवर्ण संधी!!

धमाका ऑफर

३ दिवस मोफत!

तुमच्या व्यवसायाला हवी आहे का मोठी प्रसिद्धी? मग 'दैनिक विदर्भ केसरी' देत आहे तुम्हाला एक जबरदस्त प्लॅटफॉर्म!

१ दिवसाच्या जाहिरातीवर ३ दिवस मोफत!

कोणासाठी: दुकानदार, शैक्षणिक संस्था, शोरूम्स आणि सर्व व्यावसायिकांसाठी.

घाई करा! ही संधी सोडू नका.

अधिक माहितीसाठी संपर्क करा:

9975532291/9096945629

## डॉक्टरचा आत्महत्येचा प्रयत्न

**विदर्भ केसरी।**

डोंबिवली येथील एका नामांकित रुग्णालयातील डॉक्टरने 10 बिअर आणि तब्बल 45 झोपेच्या गोळ्यांचे सेवन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या टोकाच्या पाऊलामुळे डोंबिवलीच्या वैद्यकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, सुदैवाने वेळीच उपचार मिळाल्याने या डॉक्टरचे प्राण वाचले आहेत. विशेष म्हणजे, आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या या डॉक्टरची पत्नी देखील शहरातील एक नामांकित डॉक्टर असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, एका नर्ससोबत असलेल्या प्रेमसंबंधातून हा सर्व प्रकार घडला आहे. संबंधित नर्स लग्नासाठी वारंवार तगादा लावत असल्याने मानसिक दडपणाखाली येऊन डॉक्टरने हे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. याप्रकरणी डोंबिवलीतील विष्णूनगर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली असून घटनेचा सखोल तपास सुरू केला आहे. प्रेमप्रकरण आणि त्यातून झालेला हा आत्महत्येचा प्रयत्न सध्या शहरात चर्चेचा विषय ठरला आहे.

## महामार्गावर रम्बलर बसवा - जयंत पाटील

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी साहेबांनी पुढाकार घेऊन पेठ नाका ते सांगली राष्ट्रीय महामार्ग अतिशय चांगला केला. परिणामी वेग वाढला आहे. त्यामुळे शहर आणि वस्ती असलेल्या भागात रम्बलर लावण्यात यावे. तसेच स्पीड गन बसविण्यात याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी आज लक्षवेधीद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली. त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाला.

# राज्यपाल खोटे बोलले

## भास्कर जाधव : कायदा सुव्यवस्थेचे वाटोळे

**विदर्भ केसरी।**




ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी राज्यपालांच्या अभिभाषणात सहभागी होत सरकारच्या कामकाजाची अक्षरशः पिसे काढली. ते म्हणाले, आम्ही संख्येने कमी आहोत म्हणून आमची टिंगल टवाळी करण्यापेक्षा आमचा योग्य तो मान सन्मान राखा. आम्हाला लोकांनी निवडून दिले आहे. पण तुम्ही आम्हाला एकही पैसा विकासासाठी देत नाही. याचा अर्थ तुम्हाला असे वाटते की, तुम्ही आमची जिरवत आहात. पण आमची काहीही जिरत नाही. नियतीच्या मनात असेल ते घडेल. पण तुम्ही त्या भागाचेच वाटोळे करत आहात. त्या भागातील जनतेवर तुम्ही अन्याय करत आहात. असे करू नका अशी विनंती करतो.

राज्यपालांच्या अभिभाषणाला आम्ही विरोध का केला? याचे सर्व मुद्दे आम्ही सांगितलेत. या प्रकरणी अनेक मुद्दे सांगण्यासारखे आहेत. राज्यातील कायदा सुव्यवस्थेचे वाटोळे झाले आहे. किती बोजवारा उडाला आहे. त्यासंदर्भातही मला बोलायचे होते. पण मी ते बोलणार नाही. मी राज्यपालांच्या भाषणाचा विरोध करतो. राज्यपालांना तुम्ही सर्व खोटे बोलायला लावले म्हणून मी तुमचा निषेध करतो. आणि तुमच्या नादाला लागून राज्यपाल खोटे बोलले म्हणून त्यांच्याबद्दल खेद व्यक्त करतो, असेही भास्कर जाधव म्हणाले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी आज राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत सहभागी होताना सरकारचे अक्षरशः वाभाडे काढले. राज्यपालांचे अभिभाषण अतिशय नीरस होते. त्यात राज्याच्या विकासाची कोणतीही दिशा नव्हती, असे ते म्हणाले.

या राज्यात कुणीतरी बाहेरून येऊन सांगतो की, मुंबई ही केवळ मराठी लोकांची नाही. ती अनेक भाषिकांची आहे. त्याची ही भाषा सत्ताधारी माना खाली घालून ऐकतात. हे बाळासाहेब ठाकरेंचे धोरण होते काय? त्यांचा विचार होता काय? कधीतरी स्वाभिमानाने ताठ उभे राहिले पाहिजे. या प्रकरणी परिणामांची परवा न करता उभे राहिले पाहिजे. कधीतरी आपला स्वाभिमान, कधीतरी आपला सन्मान, कधीतरी आपली अस्मिता, कधीतरी आपल्या विचारांशी आपण बांधिल असले पाहिजे, असे ते म्हणाले.

## भास्कर जाधव यांनी काढली सरकारची पिसे



■ राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली आहे. आज अधिवेशनाचा दुसरा दिवस आहे. आज मंत्रालयातील लाचखोरी प्रकरणी विरोधक चांगलेच आक्रमक झालेले पहायला मिळाले.

## अवकाळीमुळे झालेल्या नुकसानाचं सर्वेक्षण करण्याचे आदेश

■ **राज्यात मराठवाडा, विदर्भासह कोकणाच्या अनेक भागांत काल पडलेल्या अवकाळी पावसामुळे पिकांच्या झालेल्या नुकसानाचं सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले जातील असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत सांगितलं.**

## सभागृहात राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

■ **विधानसभेत दुपारनंतर राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरू झाली आहे. भाजपचे जळगाव जामोदचे आमदार डॉक्टर संजय कुटे यांनी या चर्चेला सुरुवात केली. त्यात त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न, आरोग्य समस्या तथा राज्यापुढील विविध प्रश्नांवर भाष्य केले. ही चर्चा उद्याही सुरू राहण्याची शक्यता आहे.**

## धनंजय मुंडेंनी मांडला गारपीटीचा मुद्दा

■ **सोमवारी बीड जिल्ह्यासह राज्यातील लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी जिल्ह्यात तसेच मराठवाड्यासह पूर्व विदर्भ, कोकण आदी भागांमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपिटीने रब्बी पिकांचे तसेच भाजीपाला व फळपिकांचे मोठे नुकसान झाले होते. धनंजय मुंडे यांनी आज विधानसभेत पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून याकडे राज्य शासनाचे लक्ष वेधले.**

■ **धनंजय मुंडे यांनी यावेळी अवकाळी व गारपिटीने जमीनदोस्त झालेली गहू, ज्वारी, हरभरा, भाजीपाला तसेच नुकसान झालेली फळपिके या सर्वांचे तातडीने पंचनामे करून शासनास नुकसानीचे अहवाल सादर करण्याबाबत संबंधित जिल्हा प्रशासनास निर्देश देण्याची विनंती केली. त्यावर राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून नुकसानग्रस्त सर्व जिल्ह्यात तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात येतील, अशी ग्वाही दिली.**

## अजितदादांच्या घातपात प्रकरणाची चौकशी वेगाने व्हावी - जितेंद्र आव्हाड

■ **अजितदादांच्या घातपात प्रकरणाची चौकशी ही वेगाने व्हायला हवी. कारण विलंब लागला की संशय वाढतो, असे म्हणत आमदार जितेंद्र आव्हाड यांनी माध्यमांशी बोलताना अजित पवार यांच्या अपघाताबाबत प्रश्न उपस्थित केला.**

## मनीषा कायंदे यांनी मांडला प्रश्न

■ **रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, शहापूर, जि. ठाणे इथे प्रचंड घोटाळ्यांचे राज्य आहे. पोलिसांकडे एफआयआर दाखल करूनही त्याच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. यावर कारवाई का केली नाही, या संस्थेला मान्यता कशी मिळाली असा प्रश्न आमदार डॉ. मनीषा कायंदे यांनी उपस्थित केला.**

■ **विधानपरिषदेत सुनेत्रा पवार यांची ओळख**

■ **विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेच्या गटनेत्या' म्हणून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची सभागृहाला ओळख करून दिली. यावेळी त्यांच्या मंत्रिपदाचा परिचय सभागृहातील सर्व सदस्यांना शिंदे यांनी करून दिला.**

## कुरीयरमध्ये ड्रग्ज आढळले तर कंपनीची खैर नाही – मुख्यमंत्री

**विदर्भ केसरी।**

कुरीयर कंपन्यांनी पार्सल स्विकारताना त्यात ड्रग्ज नाही याची खात्री केली पाहिजे. अन्यथा त्यांच्यावरही कारवाई केली जाईल. कृत्रीम ड्रग्जसाठी लागणारी रसायने आयात करणाऱ्या कंपन्यांवर लक्ष ठेवण्यात येत आहे. सरकारची ड्रग्ज बाबत 'झिरो टॉलरन्स' पॉलिसी आहे. पोलिस अधिकारी सहभागी सापडले तर थेट बडतर्फ केले जात आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत सांगितले.

## अधिवेशनात विक्रम काळेंचा संताप:

**विदर्भ केसरी।**

राज्यातील अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली असून आज दुसरा दिवस पार पडला. राज्य विधिमंडळाचे हे अधिवेशन 23 फेब्रुवारीपासून सुरू होऊन 25 मार्चपर्यंत चालणार आहे. 6 मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. विविध प्रश्नांवर सभागृहात चर्चा सुरू असतानाच शिक्षकांना शिकवण्याव्यतिरिक्त दिल्या जाणाऱ्या कामांबाबतचा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार विक्रम काळे यांनी शिक्षकांवर टाकल्या जाणाऱ्या अशैक्षणिक जबाबदाऱ्यांविषयी तीव्र नाराजी व्यक्त केली. विक्रम काळे यांनी सभागृहात प्रश्न मांडताना सांगितले की, राज्यातील शिक्षक संघटना आणि लोकप्रतिनिधी वारंवार शासनाकडे पाठपुरावा करत आहेत की शिक्षकांकडील अशैक्षणिक कामे कमी करावीत आणि त्यांना केवळ विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम द्यावे. मागील राज्यशिक्षक पुरस्कार वितरण समारंभात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही शिक्षकांना शिकवण्याव्यतिरिक्त इतर कामे देणार नसल्याचे आश्वासन दिल्याची आठवण त्यांनी करून दिली. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असल्याचा आरोप करत त्यांनी शिक्षकांना कुत्रे मोजण्याचे काम दिल्याचे परिपत्रक निघाल्याचा दावा केला आणि हा शिक्षकांचा अपमान असल्याचे म्हटले.

## चारचाकी व एसटीचा भीषण अपघात : एक व्यक्ती जागीच ठार

### दोन महिला गंभीर जखमी

**विदर्भ केसरी।संघरतन सरदार**




अकोट अंजनगाव महामार्गावर मातृशाया सोशल वेल्फेअर सोसायटी दवाखाना भंडारज जवळ चार चाकी कार क्रमांक MH 27 be 8081 आणि एसटी बस क्र. MH 20 GC 3932 समोरासमोर आल्याने मोठा अपघात झाला आहे. स्विफ्ट डिझायर चार चाकी वाहन हे अकोट वरुन अंजनगाव सुर्जी दिशेने येत होते तर एसटी बस अंजनगाव कडून अकोट कडे जात होती चालक शालिकराम वानरे अकोट येथिल रहिवासी यांचा मोठा अपघात झाल्याने जागीच दुर्दैवी मृत्युमुखी पडले तर चारचाकी वाहना मधील दोन महिला गंभीर जखमी व दोन किरकोळ जखमी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. ग्रामीण रुग्णालय अंजनगाव सुर्जी येथे अपघातग्रस्तांना औषधोपचार करिता घेऊन गेले आहे. एसटी मधील प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. चारचाकी वाहना मध्ये नवीनच लग्न केलेले जोडपं देवदर्शनाला आपल्या कुटुंबासोबत जात असल्याची चर्चा घटनास्थळी ऐकायला मिळाली. आणि वाहण चालक वडील आणि कुटुंबातील नातेवाईक असल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनास्थळी तातडीने ॲम्बुलन्स आल्याने भंडारज येथील सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ यांनी अपघात ग्रस्तांना तातडीने उचलून उपचाराकरिता पाठविण्यात आले.

## दूध उत्पादक शेतकरी जगला, तरच ग्रामीण अर्थव्यवस्था टिकेल.

### विधानसभेत आमदार हरीश पिंपळे यांनी सरकारचे वेधले लक्ष!

**विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**




राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यथांचा आवाज घुमला. "दूध उत्पादक शेतकरी जगला, तरच ग्रामीण अर्थव्यवस्था टिकेल," अशा शब्दांत लोकप्रतिनिधी आमदार हरीश पिंपळे यांनी सरकारला घरचा आहेर देत दुग्धव्यवसायातील गंभीर वास्तवाकडे लक्ष वेधले. वाढती महागाई, निकृष्ट बियाणे आणि अनुदानातील सावळागोंधळ यावर आज विधिमंडळात जोरदार चर्चा झाली. महागाईचा विळखा: ३० ची ढेप ४१ वर! सरकार दर वाढले नसल्याचा दावा करत असले, तरी जमिनीवरची परिस्थिती अत्यंत विदारक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नोव्हेंबर महिन्यात ३० रुपयांना मिळणारी ढेप आज ४१ रुपयांवर पोहोचली आहे. पशूखाद्याचे दर गगनाला भिडल्यामुळे दुधामुळे नफा मिळणे तर लांबच, पण झालेला खर्च निघणेही कठीण झाले आहे. पशूखाद्याच्या वाढत्या किमतींमुळे दुग्धव्यवसाय तोट्यात जात असल्याचा मुद्दा यावेळी प्रकर्षाने मांडण्यात आला. वैरण विकास कार्यक्रमाचा बोजवारा शासनाच्या वैरण विकास कार्यक्रमांतर्गत मिळणारे बियाणे निकृष्ट दर्जाचे निघत असल्याचा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला. निकृष्ट बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, चारा टंचाईचा प्रश्न उग्र होत आहे. दुभती जनावरे दूध कमी देऊ लागली की ती थेट कसाईखान्यात पाठवली जात आहेत, ही राज्याच्या कृषी संस्कृतीसाठी चिंतेची बाब असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. प्रमुख मागण्यांचे 'रिपोर्ट कार्ड': शेतकऱ्यांच्या हक्कासाठी विधानसभेत खालील प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या:

■ **पशूखाद्यावर सबसिडी.**

प्रत्येक दूध उत्पादक शेतकऱ्याला दरमहा ५ क्विंटल ढेप अर्ध्या किमतीत किंवा मोठ्या सबसिडीवर उपलब्ध करून द्यावी.

**कुटाराची उपलब्धता:** पीकेव्ही हरभऱ्याचे कुटार शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात मिळावे, जेणेकरून चाऱ्याचा प्रश्न सुटेल.

'चिल्लर' लहान, दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रति लिटर ५ ते ७ रुपये अनुदान थेट त्यांच्या बँक खात्यात जमा व्हावे. सध्या डेअरी चालकांमुळे हे अनुदान प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याची तक्रार यावेळी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी माझी लढाई विधानसभेत सुरूच राहील. जोपर्यंत छोट्या दूध उत्पादकांना थेट लाभ मिळत नाही, तोपर्यंत सरकारला जाब विचारत राहू!"

## मंत्र्यांनी लक्षवेधीवर बोलताना अभ्यास करून यावे

### नुसते बघतो, बैठक लावतो, असे म्हणून चालत नाही; मुनगंटीवारांनी उडवली मंत्र्यांची भंबेरी

**विदर्भ केसरी।**







भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज विधानसभेत लक्षवेधीला उत्तर देण्याच्या मुद्यावरून अन्न व नागरी पुरवठा विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम यांना अक्षरशः फैलावर घेतले. लक्षवेधीवर बोलताना मंत्र्यांनी अभ्यास करून यायला हवे. केवळ बघतो, बैठक लावतो, असे सांगून चालत नाही, असे ते या प्रकरणी मंत्री कदम यांचे कान टोचत म्हणाले.

राज्य विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी आज राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस देण्याच्या मुद्यावर लक्षवेधी मांडण्यात आली. या प्रकरणी विरोधकांनी सरकारला धारेवर धरल्यानंतर त्यांना सत्ताधारी आमदारांचीही साथ मिळाली. यात भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सरकारला अक्षरशः सळो की पळो करून सोडले. त्यांनी लक्षवेधीला थातूर मातूर उत्तर देण्याच्या मुद्यावरून अन्न व नागरी पुरवठा मंत्री योगेश कदम यांना चांगलेच खडेबोल सुनावले. लक्षवेधीवर बोलताना मंत्र्यांनी अभ्यास करून यायला हवे. केवळ बघतो, बैठक लावतो असे बोलून चालत नाही, असे ते म्हणाले.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, राज्यातील तब्बल 7 लाख शेतकरी धानाच्या बोनसच्या घोषणेची वाट पाहत आहेत. 15 डिसेंबर 2025 रोजी मी धान उत्पादक शेतकऱ्यांना घेऊन मुख्यमंत्र्यांची भेट घेतली होती. तेव्हा त्यांनी या प्रकरणी तत्काळ कार्यवाहीचे आदेश दिले होते त्यामुळे जानेवारीत यासंबंधीचा जीआर निघेल अशी अपेक्षा होती. पण सुरुवातीला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचे कारण पुढे करण्यात आले. ही निवडणूक संपली. त्यानंतरही बोनसचा जीआर निघाला नाही. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी 25 डिसेंबर रोजी स्पष्ट आदेश दिले असतानाही माननीय राज्यमंत्र्यांचा अन्न व नागरी पुरवठा विभाग अजूनही कुंभकर्णाचा बाप बनून झोपलेला आहे. ही अधिवेशनातील पहिलीच लक्षवेधी होती. अधिवेशनात पहिलाच निर्णय शेतकऱ्यांच्या हिताचा होणे अपेक्षित होते. राज्यमंत्र्यांकडून धान उत्पादकांच्या बोनसविषयी ठोस व नेमक्या उत्तराची अपेक्षा होती. पण ती फोल ठरली, असे ते म्हणाले.

### योगेश कदम यांनी काय दिले उत्तर?

■ **सुधीर मुनगंटीवार यांचा हा रोष पाहून योगेश कदम यांनी धान उत्पादकांना गत 3 वर्षांत देण्यात आलेल्या बोनसची आकडेवारी सभागृहाच्या पटलावर सादर केली. ते म्हणाले, 2022-23 मध्ये बोनस म्हणून आपण 823 कोटी रुपयांचा निधी खर्च केला होता. त्यानंतर 2023-24 मध्ये आपण 1378 कोटी दिले. 2024-25 मध्ये 1628 कोटींचा निधी यासाठी जारी करण्यात आला. नोंदणीकृत शेतकऱ्यांना ही रक्कम दिली जाते. पण ही रक्कम व धान खरेदीच्या गुणोत्तराचे प्रमाण याची फेरतपासणी होण्याची गरजेची आहे, असे कदम म्हणाले.**

## कामचुकार कर्मचाऱ्यांसाठी 'ठोको विधेयक' आणावे लागेल : मुनगंटीवार

**विदर्भ केसरी।**

भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार आज विधानसभेतील कामकाजात होणाऱ्या दिरंगाईच्या मुद्यावर कामचुकार अधिकाऱ्यांवर चांगलेच संतापले. या प्रकरणी त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सहमती दर्शवली. तसेच विधान मंडळाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेत विधीमंडळाचे कामकाजाचे लवकरच डिजिटलायझेशन होणार असल्याचे स्पष्ट केले.

सुधीर मुनगंटीवार आज विधानसभेत बोलताना म्हणाले की, मुख्यमंत्री व विधानसभा अध्यक्ष कामकाजाचा दर्जा सुधारण्यासाठी व गुणात्मक बदल करण्यासाठी विविध दिशानिर्देश देत असतात. पुरवणी मागण्या मांडल्यानंतर कपात सूचनेचे उत्तर 30 दिवसांत मिळणे हा सदस्याचा अधिकार आहे. पण मागच्याही अधिवेशनात लक्षवेधीची उत्तरे मिळाली नाही. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांनी या प्रकरणी सुमोटो घेत मुख्य सचिवांवर हक्कभंग आणण्याची घोषणा केली होती. मी 16 मार्च 2022 रोजी कपात सूचना मांडली होती. त्याचे उत्तर मला गत 18 फेब्रुवारी रोजी मिळाले.

या काळात एक विधानसभा बदलली. सरकारी कर्मचाऱ्यांच्या मनात विधानसभेत होणाऱ्या कामकाजाविषयी गांभीर्य नसेल, उदासीनता असेल व कामकाजाविषयी त्यांच्या मनात कुठली भीती नसेल तर या कामकाजाचा गुणात्मक दर्जा वाढवण्यासाठी तुम्ही जे काही करत आहात, त्याला काहीही उपयोग नाही, असे सुधीर मुनगंटीवार विधानसभा अध्यक्षांना उद्देशून म्हणाले.

# दिव्यानुभव: ईब्तिदा- ए- मुंगसाजी माऊली!

'दैवी तत्त्वाच्या संपर्कात असणे हे जीवनातील सर्वोच्च कल्याण आहे आणि उर्वरित सर्व गोष्टी त्याच्या अधिन असाव्यात किंवा त्याच्याशी एकरूप व्हाव्यात'
-- योगी श्री अरविंद

''''''''''''''''''''''''


'देवाच्या सानिध्यात सर्वजण बालकच असतात कारण केवळ बाल हृदयालाच त्या राज्यात प्रवेश मिळतो'
--रवींद्रनाथ टागोर.

**न.मा.जोशी ८८०५८४८९५१**



■ (लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक, राज्य मागास आयोगाचे माजी सदस्य आणि 'दर्पण' पुरस्कार प्राप्त पत्रकार आहेत)

स्वप्न आणि वास्तव यांचा काहीही संबंध नाही असा माझा ठाम विश्वास आहे. मात्र परमेश्वरी अवताराच्या रूपात ज्या संत महात्म्यांचे दर्शन स्वप्नात घडते ती स्वप्ने साकार होतात किंवा त्यांचा वास्तवाशी काहीतरी संबंध असतो याची मात्र खात्री झाली आहे .मला याचा दिव्यानुभव आला आहे.हे नोंदवण्याचे कारण असे की आठ दिवसांपूर्वी मला एक स्वप्न पडले. एका स्टेजवर अत्यंत सुंदर मूर्ती होती आणि जी मूर्ती होती तीच व्यक्ती मागे बसलेली होती. त्या व्यक्तीच्या मागे माजी मंत्री शिवाजीराव मोघे उभे होते. मी त्यांना विचारले हे संतमहात्मे कोण आहेत? मोघे साहेब म्हणाले, हे मुंगसाजी महाराज आहेत . मी त्या मुंगसाजी महाराजांना म्हणालो की आमच्या दारव्हा जवळ सुद्धा एक मुंगसाजी महाराज आहेत, ते म्हणाले 'तो मीच आहे'. काही क्षणातच श्री सत्य साई बाबा मला म्हणत आहेत की 'हा मीच आहे'. तेव्हा त्या स्वप्नातच माझ्या आनंदाला पारावार उरला नाही कारण हे स्वप्न नसून वास्तव आहे कारण सत्य साईबाबांनी म्हटले आहे की माझे स्वप्न ,स्वप्न नसते ते वास्तव असते. माझा हा आनंद कुणाशी शेअर करावा असे वाटले तेव्हा मला प्रसिद्ध विधिज्ञ निवृत्त न्यायाधीश विजय राणे यांचे नाव आठवले कारण त्यांनी मुंगसाजी माऊली चरित्रामृत हा हा ग्रंथ लिहिलेला आहे. त्यांचा आणि माझा अनेक वर्षांपासूनचा कौटुंबिक संबंध आहे. त्यांना मी हे सारे स्वप्न कथन केले. मी तुला धामणगाव देव येथे मुंगसाजी महाराजांच्या दर्शनाला घेऊन जातो. माऊलींचे स्वप्नात येणे ही फार भाग्याची गोष्ट आहे. माझ्याही मनात माऊलींच्या दर्शनाची तीव्र इच्छा निर्माण झाली. दरम्यान पाच-सात दिवसानंतर मी शिवाजीराव मोघे यांनाही हे स्वप्न सांगण्यासाठी फोन केला. त्यांचा आणि मुंगसाजी माऊलीचा काही संबंध असेल असे वाटले नव्हते. कारण ते सत्य साईंचे भक्त आहेत. मात्र जेव्हा त्यांना फोन केला तेव्हा ते मुंबईत होते आणि मी काही सांगण्यापूर्वीच ते म्हणाले की मुंबईत मुंगसाजी महाराजांची समाधी आहे त्या समाधीच्या दर्शनासाठी जाण्याची इच्छा आहे माझ्यासोबत असलेले प्रशांत अड्यालवार सत्यसाई चे भक्त असून आले इतर कोणत्या संत महात्म्याच्या दर्शनाची गरज नाही. मात्र मी मोघे साहेबांना मुंगसाजी महाराजांच्या स्वप्नाचा माझा किस्सा सांगितला तुम्ही मुंगसाजींच्या मागे उभे होते तुम्हीच हे मुंगसाजी महाराज असल्याचे सांगितले आणि सत्य साई बाबा सुद्धा म्हणाले हा मीच आहे. आमचा हा संवाद प्रशांत अड्यालवार यांनी ऐकला. त्यांनाही मी सारे स्वप्न सांगितले. तेव्हा त्यांनी लगेच आपला विचार बदलला आणि शिवाजीराव मोघे यांना घेऊन ते मुंबईत मुंगसाजी महाराजांच्या समाधीचे दर्शन घेऊन आले. आश्चर्य असे की मी यवतमाळ होऊन धामणगावला जात असताना या स्वप्नाचा किस्सा फोनवरून मोघे साहेबांना सांगत होतो हा सर्व किस्सा ऐकणारा टॅक्सी ड्रायव्हर आणि संत वृत्तीचा माणूस शेषराव आंधळे यांनी गाडीत टॅक्सी चालवतानाच आपल्या खिशातून मुंगसाजी महाराजांचा फोटो काढून दिला आणि माऊलींचे दर्शन घ्या म्हणून सांगितले माझ्या आनंद शब्दातीत होता. धामणगाव देव येथे जाऊन मुंगसाजी महाराजांच्या दर्शनाची इच्छा अधिक तीव्र झाली. मात्र मला काही कामासाठी खामगावला जावे लागले. येताना मी ड्रायव्हर शेषराव आंधळे यांना फोन केला. ते म्हणाले मी डॉक्टर प्रताप तारक यंदा घेऊन धामणगाव देव येथे मुंगसाजी महाराजांच्या दर्शनाला जात आहे. डॉक्टर तारक यांनाही मी स्वप्न सांगितले त्यांनाही खूपच आनंद झाला. हे स्वप्न मी एडवोकेट कल्याणी बनसोड हिला सांगितले ती म्हणाली, माझे आजोबा,आई वडील आणि सारे कुटुंब मुंगसाजी महाराजांचे भक्त आहेत. मी मनात म्हणालो हे मुंगसाजी महाराज माझा पिच्छा सोडत नाहीत. खामगाव वरून यवतमाळला टॅक्सीने परत येताना बोधेगाव दारव्हा यवतमाळ मार्गावर पालखी आणि दिंड्या दिसल्या. आर्या यात्रेकरूंची लांबची लांब रांग दिसली. चौकशी केली तेव्हा समजले की मंगळवारी २४फेब्रुवारीला धामणगाव देव येथे मुंगसाजी महाराजांची पुण्यतिथी महोत्सव मोठ्या प्रमाणात होणार आहे.त्यासाठी पालख्या दिंड्या पायी जात आहेत. पाय ठेवायलाही जागा राहणार नाही इतके प्रचंड यात्रा भरणार आहे. पायी चालणाऱ्या दिंड्यांमध्ये तरुण-तरुणी मध्यमवर्गीय वयोवृद्धांचाही प्रचंड समावेश पाहून श्रद्धेला मोल नाही हेच खरे असल्याचे जाणवले.22 तारखेला विजय राणे यांना फोन केला ते म्हणाले 23 तारखेला सकाळी आपण धामणगाव देव ला माऊलीच्या दर्शनासाठी जाऊ आणि त्याप्रमाणे त्यांच्या गाडीत माझी पत्नी चंदन जोशी, एडवोकेट विजय राणे साहेब आणि त्यांचा ड्रायव्हर धनंजय असे चौघे जण यवतमाळ भरून सकाळी सात वाजता माऊलींच्या दर्शनासाठी निघालो. यवतमाळ बाहेर दारव्हा मार्गावर लागताच आमच्या गाडीसमोरून एक मुंगूस आडवे गेले. तेव्हा ड्रायव्हर धनंजय म्हणाला हे घ्या मुंगसाजी महाराजांचे दर्शन झाले. खरोखरच माऊलींची अद्भुत कृपा. धामणगाव (देव)ला पोहचल्यावर माऊलींच्या दरबारात प्रत्यक्ष प्रवेश करुन बंगईचे दशर्न स्पर्शन झाले, भुयारातील समाधी दर्शन वीज खंडीत झाल्याने मोबाईल बॅटरीच्या प्रकाश झोतात घेता आले. चिंचवृक्षाखालील समाधी दर्शनही निवांतपणे घेता आले. तिथे संस्थांनचे अध्यक्ष डॉ संजय देशमुख आमचे मन:पूर्वक स्वागत केले. जुन्या आठवणींना उजाळा हाही एक वेगळा अनुभव आहे. डॉक्टर संजय देशमुख डीएचएम एस ही होमिओपॅथीची परीक्षा देत होते तेव्हा त्या परीक्षांचा मी इन्चार्ज होतो ही डॉक्टर देशमुख यांनी सांगितलेली आठवण फार सुखावह होती. माऊलीच्या दर्शनाचा अद्भुत विलक्षण असा दिव्यानुभव शब्दातीत आहे. देव वरून परत येताना रस्त्यात 'ज्ञानेश्वरी'ची अभ्यासक चिंतक आणि प्रवचनकर्ती, स्वेच्छेने अविवाहित राहून आश्रमीय जीवनाचा स्वीकार करणाऱ्या ऋषितुल्य द.तु. नंदापुरे गुरुजी यांची कन्या अपर्णा नंदापुरे हीचा फोन आला. मुंगसाजी माऊलीचे दर्शनघेऊन यवतमाळला परत जात असल्याचे तिला सांगितले. काय आश्चर्य! तीने सांगितले की लोही च्या ह.भ.प.पंढरीदास खर्डेकर यांनी लिहिलेल्या मुंगसाजी महाराज चरित्र (२१अध्याय) ग्रंथाचा तीने भावार्थ गद्यानुवाद केला आहे.मुंगसाजी देवांची केवढी ही कृपा. भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी, श्री सत्यसाई सेंट्रल ट्रस्टचे विश्वस्त, सत्य साईंच्या सानिध्यात राहिलेल्या के.चक्रवर्ती यांनी सांगितले आहे की, संतांच्या सान्निध्यात जगणे म्हणजे जणू अखंड वसंतऋतूमध्ये चालत राहणे होय. ते केवळ शारीरिक जवळीक शिकार नसते; तर ते म्हणजे दैवत्त्वाची हवा श्वासात घेणे असते, अनंताला मानवी रूपात हालचाल करताना पाहणे असते, सनातनाला हसताना, बोलताना, चालताना पाहणे असते आणि तरीही मनाच्या आवाक्यापलीकडे असलेले त्याचे अस्तित्व अनुभवणे असते. त्यांचे समकालीन असणे हा क्वचितच मिळणारा विशेषाधिकार आहे .आपण कृष्णाच्या शिष्यांबद्दल, बुद्धांच्या सहवासातील साधकांबद्दल किंवा ख्रिस्ताबरोबर चाललेल्या लोकांबद्दल वाचतो. त्यांच्या दृष्टीने दैवीतत्व हे त्यांच्याशेजारी धडधडणारे जीवंत हृदय होते. रवींद्र नाथ टागोर म्हणतात की 'जो अनंताची निवड करतो, त्यालाच अनंत निवडते.' जर आपण निवडले गेलेलो असू, तर आपल्या जीवनातून आपली कृतज्ञता व्यक्त झाली पाहिजे. माऊलीने जसे शिकवले तसे आपण जगले पाहिजे, तीने त्यांनी जशी सेवा केली तशी सेवा आपण केली पाहिजे, आणि जसे प्रेम केले तसे प्रेम केले पाहिजे. मीर तक़ी मीर चा प्रेमाबद्दल प्रसिद्ध शेर आहे "इब्तिदा-ए-इश्क़ है..., आगे-आगे देखिए होता है क्या"आहे इब्तिदा-ए-इश्क़म्हणजे अरे ही तर प्रेमाची सुरुवात आहे, मला ही म्हणावेसे वाटते ईब्तिदा- ए- मुंगसाजी माऊली! आगे-आगे देखिए होता है क्या"





## अग्रलेख

# अवकाळीचा फटका

थंडीला निरोप मिळाल्यानंतर उन्हाळ्याची चाहूल लागली असतानाच, मध्येच आलेल्या पावसाने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडवली. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याचा थेट परिणाम महाराष्ट्राच्या हवामानावर जाणवू लागला आहे. हा पट्टा दक्षिण मध्य महाराष्ट्रापर्यंत पसरल्यामुळे राज्यातील अनेक भागात अचानक वातावरण बदलले असून अनेक ठिकाणी पावसाने हजेरी लावली. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात सध्या अंशत: ढगाळ आकाश राहण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. उर्वरित भागामध्ये तापमानवाढ कायम राहणार असल्याने उष्णतेचा त्रास जाणवू शकतो. मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, नांदेड आणि हिंगोली या जिल्ह्यांसह मध्य महाराष्ट्रातील सोलापूरमध्ये विजांच्या कडकडाटासह हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे. २३ फेब्रुवारी रोजी पूर्व विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांत वादळी पावसाचा जोर वाढण्याची शक्यता लक्षात घेता, हवामान विभागाकडून 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. गत २४ तासांत राज्यातील काही भागांना अवकाळी पावसाचा फटका बसला. मध्यरात्री नागपूर शहरासह जिल्ह्यातील काही भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली. ऐन उन्हाळ्यात अचानक कोसळलेल्या पावसामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांची मोठी धावपळ उडाली. दिवसभर कडक ऊन असतानाच रात्री अनपेक्षितपणे पावसाने जोर धरल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. या पावसामुळे शहरातील काही घरांचे नुकसान झाले. राज्यासह देशातील हवामानात मोठा बदल होत आहे. थंडी, पाऊस आणि उन्हाळा अशा तिन्ही हंगामांचा अनुभव येत आहे. सकाळी थंडी आणि दुपारी कडक ऊन अशी स्थिती आहे. उत्तरेकडे थंडी तर राज्यात थंडी जवळपास गायब झाली आहे. पहाटे थोडासा गारठा जाणवतो आहे. राज्यातील काही शहरांत वायुप्रदूषण हा गंभीर मुद्दा बनला आहे. मुंबईमध्ये वायुप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले असून हवा घातक बनली आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार राज्यात सध्या पावसाला पोषक वातावरण आहे. उन्हाच्या झळा अधिक तीव्र होत असतानाच पावसाने हजेरी लावली आहे. धुळ्यात १४ अंश सेल्सिअस अशी राज्यातील नीचांकी तापमानाची नोंद झाली. पुढील काही दिवसांत राज्यात उन्हाचा चटका वाढण्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा, केरळ, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान या भागात पावसाचा अंदाज आहे. गत काही दिवसांपासून राज्यातील हवामान पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. फेब्रुवारी महिना असूनही पावसाने हजेरी लावली आहे. सकाळी थंडी, दुपारी कडक ऊन आणि अचानक सायंकाळी वादळी वा-यासह पाऊस अशी स्थिती अनेक भागात पाहायला मिळते. या बदलत्या हवामानामुळे नागरिकांबरोबरच शेतक-यांचीही मोठी अडचण झाली आहे. सोमवारी राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. कर्नाटकपासून मराठवाड्यापर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्यामुळे राज्यात पावसाळी वातावरण निर्माण झाले आहे. धाराशिव, लातूर, नांदेड, सोलापूर, हिंगोली, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये विजांसह पावसाची शक्यता आहे. इतर भागातही आकाश ढगाळ राहू शकते. पुढील दोन दिवस पावसाचा प्रभाव कायम राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला. माजलगाव तालुक्यात वादळी वा-यासह झालेल्या पावसामुळे ज्वारी, हरभरा तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले. परळी तालुक्यातही गहू आणि हरभरा पिकांना फटका बसला. लातूर जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे काढणीला आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले. रेणापूर तालुक्यातील पानगाव येथे गारांसह २० मिनिटे पाऊस झाला. अहमदपूर शहर व तालुक्यात, चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथे रविवारी रात्री हलक्या सरी कोसळल्या. शिरूर अनंतपाळ येथे जोरदार वारे आणि पाऊस झाला तर गुडसूर परिसरात रिमझिम पाऊस झाला. उदगीर तालुक्यात ढगाळ वातावरण होते. येरोळ आणि निलंगा परिसरात जोरदार पाऊस झाला. रेणापूर तालुक्यात गारपिटीमुळे हरभरा, गहू, ज्वारी, करडी ही रबी पिके आडवी झाली. वादळी वा-याने थैमान घातल्याने शेतक-यांची धावपळ उडाली. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रम सुरू आहेत. अचानक आलेल्या वादळी पावसाने त्यामध्ये व्यत्यय आला, भाविक भक्तांमध्ये धावपळ उडाली. वादळी वा-यासह थैमान घातलेल्या पावसामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी पुन्हा अडचणीत आला आहे. हातातोंडाशी आलेले हरभरा, गहू, ज्वारीची पिके मातीमोल झाल्याने शेतक-यांना पुन्हा एकदा सरकारच्या आश्वासनावर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. कांदे, मेथी, टोमॅटो, शेपू, मिरची, दोडका, कोबी, पालेभाज्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यंदा भरपूर प्रमाणात मोहोर आलेल्या आंब्याचे अवकाळी पावसाने नुकसान केले आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतक-यांना आर्थिक झळ सोसावी लागत असल्याने शेतकरी चिंतातुर झाला आहे. राज्यात सध्या हवामान झपाट्याने बदलत असून उन्हाचा तडाखा वाढताना दिसत आहे. १८ फेब्रुवारीनंतर झालेल्या पावसामुळे काही भागात गारवा निर्माण झाला होता.मात्र गत ४८ तासांत पुन्हा उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात हवामानातील बदल जाणवत आहे. २५ फेब्रुवारीच्या आसपास मराठवाडा, कर्नाटक आणि केरळमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. २६ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली आणि पुणे परिसरात रिमझिम ते मुसळधार पाऊस पडू शकतो. मार्च ते मे या कालावधीत राज्यात उष्णतेचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता आहे. सध्या कुठेही गारपिटीचा ठोस अंदाज व्यक्त करण्यात आलेला नाही. मात्र मार्च आणि एप्रिल महिन्यात मान्सूनपूर्व हालचाली दिसू शकतात. अचानक वाढणारे तापमान, अवकाळी पाऊस आणि आर्द्र वातावरण यामुळे शेती, आरोग्य आणि दैनंदिन जीवनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी लागणार आहे. राज्यात पुढील काही दिवसांत हवामानात चढ-उतार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हवामान बदलावर लक्ष ठेवावे लागणार आहे.

# पोलिस होण्याचे स्वप्न धुळीस : बनला मारेकरी

**▸विदर्भ केसरी।कळंब,**




कळंबपासून 15 किमी असलेल्या दोनोडा या गावात एका युवकाचा कुऱ्हाडीने ठेचून खून करण्यात आला. यातील एक आरोपी आशिष करलुके हा तर सध्या सुरू असलेल्या पोलिस भरतीतील एक उमेदवार असून या Murder case खून प्रकरणात त्याला पोलिसांनी आरोपी केले आहे.

मृतक अभिलाष उर्फ दत्ता केशव चौधरी (वय 33, दोनोडा) याचा गावातील आशिष मारुती करलुके याच्यासोबत 2020 मध्ये मोठे भांडण झाले होते. त्यावेळी आशिषवर भादंवि 307 अन्वये गुन्हा दाखल झाला होता. परंतु सध्या सुरू असलेल्या पोलिस भरतीत त्यातील जुना आरोपी आशिष करलुके याला परीक्षा द्यायची होती. पण अभिलाष चौधरी याने पूर्वी दाखल केलेल्या गुन्ह्यामुळे त्याला पोलिस भरतीत अडचण येईल म्हणून आशिषचे वडील मारुती करलुके (वय 55, दोनोडा) याने 23 तारखेला रात्री 8.30 वाजता अभिलाषच्या घरापुढे जाऊन जोरजोराने ओरडत, 'माझ्या मुलावर दाखल केलेले गुन्हे मागे घे, माझ्या मुलाला पोलिसची भरती परीक्षा द्यायची आहे. त्या गुन्ह्यामुळे माझ्या मुलाला पोलिस भरतीमध्ये अडचण येईल', असे बोलून भांडण केले आणि परत घरी गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी मंगळवार, 24 फेब्रुवारीला सकाळी सव्वानऊच्या सुमारास आपला मुलगा आशिषला बोलावून मारुती यांनी अभिलाष चौधरी याच्या शरीरावर कुऱ्हाडीने वार करून त्याला जागीच ठार केले. या घटनेने दोनोडा गावात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच कळंबचे ठाणेदार राजेश राठोड यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. मृतकाचे वडील केशव चौधरी यांच्या तक्रारीवरून करलुके बापलेकांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू 25 फेब्रुवारी रोजी शेगाव येथे करणार राष्ट्रीय आरोग्य मेळावा-2026 चे उद्घाटन

**▸विदर्भ केसरी। अमरावती**



भारत सरकारचे आयुष मंत्रालय, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 25 ते 28 फेब्रुवारी 2026 दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे चार दिवसांचा "राष्ट्रीय आरोग्य मेळावा 2026" आयोजित करण्यात आला आहे.

औषधी वनस्पती लागवड आणि कृषी वनीकरणाद्वारे आयुष औषध प्रणालींबाबत सर्वसामान्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे , सर्वसमावेशक आरोग्य सेवा प्रदान करणे आणि शेतकऱ्यांसाठी उपजीविकेच्या नवीन संधी निर्माण करणे हे या मेळाव्याचे उद्दिष्ट आहे.

राष्ट्रीय आरोग्य मेळावा- 2026 चे उद्घाटन बुधवार 25 फेब्रुवारी 2026 रोजी मा. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटन समारंभ संत गजानन महाराज संस्थानच्या विसावा मैदानावर होणार आहे. उद्घाटन समारंभ महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार व केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव आणि इतर अनेक मान्यवर पाहुण्यांच्या उपस्थितीत होणार आहे. या संपूर्ण मेळाव्यात नागरिकांना आयुर्वेद, योग आणि निसर्गोपचार, युनानी, सिद्ध, सोवा रिग्पा, होमिओपॅथी आणि इतर पारंपारीक आरोग्यसेवा शाखांसह विविध आयुष प्रणालीं मार्फत मोफत आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला आणि औषधे घेण्याची संधी मिळेल. आयुष क्षेत्रातील उत्कृष्ट उत्पादन पद्धती, गुणवत्ता मानके आणि अलीकडील संशोधन प्रदर्शित करण्यासाठी अनेक प्रतिष्ठित आयुष औषधनिर्माण आणि वेलनेस कंपन्या या मेळाव्यात सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर दैनंदिन आरोग्य गरजांसाठी औषधी वनस्पती आणि साध्या घरगुती उपचारांचे समर्पित प्रदर्शन देखील या मेळाव्यात भरवले जाणार आहे.

बुलढाणा जिल्हा आणि आसपासच्या भागातील शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचा शाश्वत आणि लाभदायी स्त्रोत म्हणून कृषी वनीकरण आणि औषधी वनस्पतींची लागवड स्वीकारण्यास प्रोत्साहन देणारा एक विशेष उपक्रम यावेळी आयोजित करण्यात आला असून, तो या राष्ट्रीय आरोग्य मेळावा -2026 चे एक प्रमुख आकर्षण आहे. दि. 27 फेब्रुवारी 2026 रोजी दुपारी 3.00 वाजता शेगाव येथील विसावा परिसरात "आयुर्वेदिक शेती, उत्पादन आणि विपणन" या विषयावर विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या महामेळाव्यात, शेतकऱ्यांना वनोत्पादनांवर आधारित आणि औषधी पिकांची लागवड, प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि विपणन यावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळेल जेणेकरून पारंपारिक शेती करणाऱ्यांना आयुर्वेदिक शेतीसह ते करता येईल आणि त्यांच्या उत्पन्नात भर पडेल. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी शेतकऱ्यांना आयुर्वेदिक शेती आणि उत्पादन कार्यक्रमात सक्रियपणे सहभागी होण्याचे आणि पारंपारिक पिकांसोबत औषधी वनस्पती लागवडीची क्षमता शोधण्याचे आवाहन केले आहे.

शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनीचा काही भाग औषधी वनस्पतींसाठी राखून ठेवल्याने शेतकऱ्यांना शाश्वत आणि लाभदायी उत्पन्न मिळेल, तर नागरिकांना उच्च दर्जाचे नैसर्गिक उपचार पर्याय उपलब्ध होतील आणि आयुष मूल्य साखळी अधिक मजबूत होईल असे मत त्यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र आणि शेजारील राज्यांमधील नागरिक, शेतकरी, बचत गट, विद्यार्थी, आरोग्य स्वयंसेवक आणि आयुष भागधारक यांनी शेगावला भेट देऊन राष्ट्रीय आरोग्य मेळावा 2026 चा जास्तीत जास्त लाभ घ्यावा आणि या राष्ट्रीय कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

# आ. बाळासाहेब मांगुळकर यांनी घेतली कामगार मंत्र्यांची भेट

## यवतमाळच्या रेमंड कंपनीतील कामगारांच्या उपोषणाची शासनाकडून दखल; शासन स्तरावर हालचाली;

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



यवतमाळ येथील 'रेमंड युको डेनिम प्रायव्हेट लिमिटेड' (Raymond UCO Denim Pvt. Ltd.) कंपनीतील कामगारांच्या न्याय्य हक्कासाठी सुरू असलेल्या उपोषणाची राज्य शासनाने गंभीर दखल घेतली आहे. यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी आज मुंबई येथे राज्याचे कामगार कल्याण मंत्री ना. श्री. आकाशजी फुंडकर यांची भेट घेऊन कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक हस्तक्षेप करावा, अशी आग्रही मागणी आमदार मांगुळकर यांनी केली.

यवतमाळ येथील रेमंड युको डेनिम कंपनीतील कामगार गेल्या काही दिवसांपासून आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आणि वेतनाच्या प्रश्नावरून उपोषणाला बसले आहेत. या आंदोलनामुळे कामगारांमध्ये असंतोष असून उद्योगावरही याचा परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनी आज थेट मंत्रालयात कामगार मंत्री आकाशजी फुंडकर यांची भेट घेऊन या प्रश्नावर ठोस भूमिका माडली. या भेटीदरम्यान आमदार मांगुळकर यांनी मंत्री महोदयांना अवगत केले की, कंपनीतील कामगारांचे वेतन आणि इतर कायदेशीर हक्कांचे प्रश्न प्रदीर्घ काळापासून प्रलंबित आहेत. कामगारांच्या या न्याय्य मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने तोडगा काढणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### संयुक्त बैठकीचे नियोजन

■ आमदार मांगुळकर यांनी विनंती केली की, कंपनी प्रशासन आणि कामगार प्रतिनिधी यांच्यात तातडीने एक संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी. "कामगारांचे हित अबाधित ठेवत उद्योगही सुरळीतपणे चालणे जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे. त्यामुळे सामंजस्याच्या भूमिकेतून लवकरात लवकर मार्ग काढण्यात यावा," असे त्यांनी यावेळी नमूद केले.

### शासनाचा सकारात्मक प्रतिसाद

■ कामगार मंत्री ना. आकाशजी फुंडकर यांनी आमदार मांगुळकर यांच्या मागणीची तात्काळ दखल घेत, या प्रकरणात शासन स्तरावरून सकारात्मक हस्तक्षेप करण्याचे आश्वासन दिले आहे. कामगारांच्या प्रश्नावर योग्य तो निर्णय घेऊन हा पेच लवकरात लवकर सोडवला जाईल, असे संकेतही मंत्र्यांनी दिले आहेत. या भेटीमुळे आता रेमंड कंपनीतील कामगारांच्या आंदोलनाला यश मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीश: संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## राज्यस्तरीय पुरस्कार मिळणार

■ यवतमाळ, दि. 24 (जिमाका) : महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी पात्र व्यक्ती व संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. यामध्ये नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार आणि क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कारांचा समावेश असून, इच्छुकांनी 27 फेब्रुवारी पर्यंत आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक संचालक ओमप्रकाश नगराळे यांनी केले आहे.

**महत्त्वाचे**



## शिवजयंती उत्साहात साजरी

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर (ता.प्रतिनिधी)-**

लोक कल्याण शिक्षण संस्था बनोसा द्वारा संचालित राष्ट्रीय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय तोंगलाबाद येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी मी शिवाजी बोलतोय एकपात्री प्रयोग कार्तिक पवित्रकार याने सादर करत उपस्थितांची वाह वाह मिळवली.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळेच्या प्राचार्य वर्षा काळपांडे उपस्थित होत्या. यावेळी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलेंद्र चांदेकर,संचलन प्रा डॉ मनीषा मानकर आणि आभार प्रदर्शन प्रा.पंकज पेठे यांनी केले.यावेळी विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते



## उमरखेड आगारामध्ये मुंगसाजी महाराज यांना पुण्यतिथी निमित्त अभिवादन

**▸विदर्भ केसरी। ढाणकी प्रतिनिधी मिलिंद चिकटे**

उमरखेड आगारामध्ये मुंगसाजी महाराज यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे नगराध्यक्षाचे पती एडवोकेट सतोष जैन हे प्रमुख पाहुणे होते तसेच उपस्थित नगरसेवक शिकारे , आदिवासी कृती समिती अध्यक्ष उत्तमराव पांडे , उमरखेड आगार व्यवस्थापिका प्रमोदिनी किनाके , आगारातील वाहतुक नियंत्रक सुरेश मोरे , वाहतूक नियंत्रण दत्तराव उगले, वाहतुक नियंत्रक सुधीर कोडगीरे,विकास सुर्यवंशी, माधवराव मिटकरे प्रवाशी मंडळाचे सचिव हिरासिंग चव्हाण, चंद्रकांत आष्टुरकर , विश्वनाथ पोटे लक्ष्मण ठाकरे, संभाजी काळे ,कैलास पांडे,दिपक रणमले,धुमाळे , शेळके, कराळे,जी मोरे, संतोष फाळके, सौ. वंदना वाळले, सौ.गिता मानतुटे,आगारातील सर्व कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते

## गाडगे महाराज जयंती साजरी

**▸विदर्भ केसरी।**

अरुणाताई यांच्या उपस्थितीत येवदा येथे गाडगे महाराज मंचाच्या वतीने



संत गाडगे महाराज यांची जयंती तिथीनुसार अत्यंत भक्तीभावाने व उत्साहात साजरी करण्यात आली. अन्न, वस्त्र, निवारा आणि स्वच्छतेचा संदेश देत संपूर्ण आयुष्य समाजासाठी अर्पण करणारे संत गाडगे महाराज म्हणजे माणुसकीचा जिवंत वस्तुपाठच होता. "झाडू हातात घेऊन समाज स्वच्छ करा, मन शुद्ध ठेवा" हा त्यांचा विचार आजही प्रत्येकाच्या हृदयाला स्पर्श करून जातो. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्श आजच्या तरुण पिढीने आत्मसात करण्याची नितांत गरज असल्याचे यावेळी भावनिक शब्दांत सांगण्यात आले. कार्यक्रमात बोलताना अरुणाताई गावंडे (राष्ट्रवादी तालुका अध्यक्षा) यांनी समाजसेवा म्हणजे केवळ शब्द नव्हे तर कृती असते, हे आपल्या कार्यातून सिद्ध केले आहे. कॅन्सर रुग्णांच्या सेवेसाठी त्या सातत्याने झटत असून दादर ते खारघरपर्यंत रुग्णांची निस्वार्थ सेवा करणे, दिलेल्या शब्दाला पाळणे आणि गरजूंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे त्यांचे कार्य खरोखरच प्रेरणादायी आणि अनमोल आहे. त्यांच्या सोबत कार्य करणारे सर्व कार्यकर्तेही तितक्याच निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि सातत्याने समाजहितासाठी काम करत असल्याचे त्यांनी आवर्जून नमूद केले. या भावपूर्ण कार्यक्रमास विलास मोहड, सुरेश मोहड, राजू वानखडे, रामेकर भाऊ, प्रदीप वाघमारे, राजू भाऊ मेश्राम, गोलू मोहड, रामेश्वर भाऊ इंगळे (पं. स. सभापती), ऋषिकेश गावंडे, राजू गजबिये तसेच अन्य अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत गाडगे महाराजांनी आयुष्यभर वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांसाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. त्यांचे विचार आजही समाजाला दिशा देणारे आहेत. त्यांच्या चरणी नतमस्तक होत उपस्थितांनी "जय संत गाडगेबाबा" अशा गगनभेदी घोषणा दिल्या. सामाजिक बांधिलकी, सेवा आणि माणुसकीचा संकल्प करत गाडगे महाराजांची जयंती अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली.

# प्रयोगसिद्ध लोककलांचे शाहीर प्रशिक्षण शिबिर

## शाहीर रमेश गिरी यांचे प्रभावी व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन

**▸विदर्भ केसरी।**

दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई द्वारा आयोजित प्रयोगसिद्ध लोककलांचे शाहीर प्रशिक्षण शिबिर अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडले. या दिवशी प्रमुख व्याख्याते म्हणून ज्येष्ठ व अनुभवी शाहीर रमेश गिरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे शिबिरात विशेष उर्जा आणि उत्साह निर्माण झाला. कार्यक्रमाची सुरुवात शाहीर रमेश गीरी यांनी शिबिर संचालक शाहीर संतोष खडसे छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे कर्मयोगी गाडगेबाबा प्रतीमेचे पूजन करून करण्यात आली. पारंपरिक पद्धतीने पुष्पगुच्छ देऊन शाहीर रमेश गिरी तसेच इतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. सूत्रसंचालनाद्वारे कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करण्यात आली आणि सत्रास औपचारिक प्रारंभ झाला. मार्गदर्शनाच्या प्रारंभी शाहीर रमेश गिरी यांनी शाहिरी कलेचे स्वरूप स्पष्ट केले. शाहिरी ही केवळ गायनकला नसून ती समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे, असे त्यांनी सांगितले. शाहीर हा अभ्यासू, संवेदनशील, विचारशील आणि जबाबदार व्यक्तिमत्त्व असला पाहिजे, यावर त्यांनी विशेष भर दिला. समाजातील घडामोडींचा अभ्यास, इतिहासाची जाण, शब्दांची ताकद आणि सादरीकरणातील आत्मविश्वास या गुणांमुळेच खरा शाहीर घडतो, असे त्यांनी नमूद केले. रंगमंचावरील सादरीकरणाबाबत त्यांनी अत्यंत सविस्तर मार्गदर्शन केले. मंचावर उभे राहण्याची पद्धत, देहबोली, चेहऱ्यावरील भाव, श्रोत्यांशी नजरेचा संपर्क, आत्मविश्वासपूर्ण उभरणी यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवले. माईक कसा धरावा, किती अंतर ठेवावे, आवाजातील चढ-उतार कसे नियंत्रित करावे, ओळींमध्ये योग्य ठिकाणी थांबा कसा घ्यावा, प्रभावी शब्दांवर जोर कसा द्यावा याचे सखोल स्पष्टीकरण दिले. चुकीच्या सादरीकरणाची विनोदी उदाहरणे देत त्यांनी योग्य पद्धत स्पष्ट केली, त्यामुळे संपूर्ण सभागृहात खळखळून हास्य पिकले, पण त्याचवेळी प्रशिक्षणार्थ्यांना मोलाचा धडा मिळाला. या सत्रातील विशेष महत्त्वाचा भाग म्हणजे शब्दरचना आणि आशयातील अचूकता यावरील त्यांचे मार्गदर्शन होय. गीत लिहिताना ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भांची अचूक माहिती असणे अत्यावश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. उदाहरण देताना त्यांनी "मराठी गौळण बाजाराला विकण्यानी घाली दही, दूध, ताक आणि लोणी" ही





ओळ सांगितली आणि त्यातील 'ताक' हा शब्द ऐतिहासिकदृष्ट्या अयोग्य असल्याचे स्पष्ट केले. जुन्या काळात ताक विकले जात नव्हते; ताक घरगुती वापरासाठी असायचे, तर बाजारात तूप, लोणी किंवा दूध विक्रीसाठी नेले जात असे. त्यामुळे 'ताक' ऐवजी 'तूप' हा शब्द अधिक वास्तववादी ठरतो. एका शब्दातील चूक संपूर्ण आशय बदलू शकते, म्हणून शब्दांची निवड अत्यंत जबाबदारीने आणि अभ्यासपूर्वक करावी, हा महत्त्वाचा संदेश त्यांनी दिला. यानंतर त्यांनी स्वतः लिहिलेली गीते सादर केली. प्रत्येक कडव्याचा अर्थ, त्यामागील सामाजिक संदेश, शब्दांची मांडणी, यमक आणि लय यांचे विश्लेषण करून त्यांनी गीतरचनेची प्रक्रिया समजावून सांगितली. गीतात विचारांची सलगता आणि भावनांची सुसंगती असणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले. प्रशिक्षणार्थ्यांकडूनही गीते गाऊन घेत त्यांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन केले. शब्दोच्चारातील चुका, तालातील विसंगती, आवाजातील अस्थिरता आणि देहबोलीतील त्रुटी यांकडे लक्ष वेधून त्यांनी सुधारणा सुचवली. प्रोत्साहन देत त्यांनी प्रत्येकाला आत्मविश्वासाने सादरीकरण करण्यास प्रेरित केले. संपूर्ण सत्रात हास्य आणि ज्ञान यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला.

प्रशिक्षणार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्रश्न विचारले आणि मार्गदर्शन आत्मसात केले. वातावरण प्रसन्न, पण तितकेच अभ्यासपूर्ण होते. कार्यक्रमाच्या शेवटी शिबिर संचालकांनी शाहीर रमेश गिरी यांचे मन:पूर्वक आभारप्रदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे प्रशिक्षणार्थ्यांना शाहिरी कलेची अधिक सखोल समज मिळाली असल्याचे त्यांनी नमूद केले. उपस्थित मान्यवर, आयोजक व प्रशिक्षणार्थ्यांचेही आभार मानण्यात आले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. शिबिराचा हा दिवस ज्ञान, प्रेरणा, अभ्यास आणि आत्मविश्वास यांची शिदोरी देणारा ठरला.

## बीएसआय मिशन 25 कार्यशाळेला यशस्वी करा: चौरपगार

**▸विदर्भ केसरी। अमरावती**

भारतीय बौद्ध महासभा बीएसआय मिशन-25 हा २५ कलमी कार्यक्रम महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशभरात यशस्वीरित्या राबवित आहे. 14 मार्च रोजी याच संदर्भात कार्यशाळा आयोजित केली आहे. केंद्रीय कार्यालय प्रमुख एस के भंडारे सविस्तर मार्गदर्शन करणार असून कार्यशाळेला यशस्वी करण्याकरिता जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागण्याचे आवाहन भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक विजयकुमार चौरपगार यांनी केले.

भारतीय बौद्ध महासभा तर्फे पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण सभा रविवार(ता. २२) रोजी महाबोधी बुद्धविहार, सबनीस प्लॉट येथे जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. मार्गदर्शक म्हणून विजयकुमार चौरपगार उपस्थित होते.तर अतिथी म्हणून महिला आघाडी



जिल्हाध्यक्ष माया धांडे, संगीता सरदार, महानगर अध्यक्ष प्रमिला शेंडे, गौतम गजभिये, जिल्हा सरचिटणीस गणपत तिडके धम्मपिठावर विराजमान होते. सभेच्या सुरुवातीलाच लॉन्ग मार्च प्रणेते यांच्या सहचारिणी दिवंगत प्रा. रंजना कवाडे यांना दोन मिनिटे मौन पाडून श्रद्धांजली देण्यात आली.

सभेमध्ये संघटनात्मक बळकटीकरण,कार्यशाळांचे नियोजन, सदस्य नोंदणी, श्रामनेर शिबिर बौद्धाचार्य केंद्रीय शिक्षक संविधान समर्थक जोडो अभियान जातीयंतासाठी समतेची धम्मदीक्षा कार्यक्रम राबविणे दीक्षित बौद्धांना संघटनेत महत्त्वाची पदे देणे, पाली प्रशिक्षण वर्ग सुरू करणे, 22 प्रतिज्ञा भारतीय संविधान प्रास्ताविक वाटप करणे, यासह बीएसएफ मिशन 25 च्या २५ कलमी उपक्रमांबाबत या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

सभेचे प्रास्ताविक नांदगाव खंडेश्वर तालुकाध्यक्ष मदन खंडारे यांनी केले. संचालक गणपत तिडके, आभार पुरुषोत्तम वंजारी यांनी मानले.

सभेला यशस्वी करण्याकरिता राहुल शेंडे, सविता बागडे, सुनिता रामटेके, प्रमिला शेंडे, मालती मेश्राम,वंदना शहारे, विजय लोखंडे, विलास आठवले, कांशीराम अडकणे, निखिल राऊत,सारंग पाटील, सुरेशचंद्र काळबांडे, परमानंद वासनिक, अजयकुमार ढोके, खुशाल सांभारे, विलास नागदिवे,सतीश गोपनारायण, विलास वैद्य, एन व्ही वालोंद्रे, निमा गवई, उमा वानखडे, मुरलीधर रायबोर्ड, राजेश डोंगरदिवे, राजेंद्र गडलिंग, राहुल बोरकर, रामदास वाकपांजर, विजय बोदडे, पद्माकर खाकसे, सुरेश मोहोळ, संजय घडीकर, पद्माकर मांडवधरे, राजेंद्र बसवनाथे, गौतम गजभिये, नयन मोंढे यांनी सहकार्य केले.

■ **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेली भारतीय बौद्ध महासभा ही संस्था सातत्याने समता, स्वातंत्र्य, बंधुता या तत्त्वावर आधारित बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार करणारी एकमेव संस्था आहे. बौद्धांची मातृसंस्था असून धम्मकार्य गतिमान करीत आहे. याकरिताच बीएसआय मिशन 25 राबविण्यात येत असून जिल्ह्यातील तालुका, शहर, वार्ड, नगरामध्ये व प्रत्येक तालुक्यात 56 गावात शाखा निर्माण करण्यासाठी जिल्ह्यातील पदाधिकारी कार्यकर्त्यांनी यशस्वी करण्याकरिता तन-मन-धनाने सहकार्य करण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर यांनी आपल्या अध्यक्ष भाषणातून केले.**

## गिरीश देशपांडे चे सुयश : MBA - IT च्या परीक्षेत मेरिट

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर :-**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने जाहीर केलेल्या एम बी ए परीक्षेच्या निकालात दर्यापूर चा गिरीश शशांक देशपांडे याने विद्यापीठाच्या गुणवंत्ता यादीत अव्वल स्थान मिळविले असून माहिती व तंत्रज्ञान या विषयातील एम बी ए परीक्षेत मेरिट घोषित झाला आहे, अमरावती येथील श्रीमती सुशीला सूर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यायात तो शिक्षण घेत होता 2025 च्या उन्हाळी परीक्षेचा निकाल 12 फेब्रुवारी ला विद्यापीठाने घोषित केला असून त्यात एम बी ए ( माहिती व तंत्रज्ञान ) मध्ये





दर्यापूर च्या गिरीश देशपांडे यास मेरिट घोषित करण्यात आले आहे, गिरीश देशपांडे याच्या यशाबद्दल खा बळवंत वानखेडे, इंजि नितेश वानखेडे , कॉंग्रेस नेते सुधाकर भारसाकळे, गजानन देशमुख , गाडगे बाबा मंडळाचे गजानन भरासाकळे , शिवसेनेचे अंकुश कावडकर प्रदीप मालिये, शिवसेना शिंदे गटाचे रवींद्र गणोरकर , गोपाल अरबट , सामाजिक कार्यकर्ते अजय ब्रदिया , राष्ट्रवादी चे सुशील गावंडे, पत्रकार धनंजय धांडे ,किरण होले गौरव टोळे , अमोल कंटाळे , सचिन मानकर , शिलवंत रायबोले , हरिदास खाडे , गजानन चोरपगार, गणेश साखरे , यांच्यासह हनुमान व्यायाम शाळा भवानी वेष, तथा मित्र मंडळींनी अभिनंदन केले

## तरुणाची पुलावरून उडी; शोधमोहीम युद्धपातळीवर सुरू

**▸विदर्भ केसरी। कुही :**



कुही तालुक्यातील आंभोरा परिसरात एक हृदयद्रावक घटना उघडकीस आली असून परसोडी येथील २५ वर्षीय तरुणाने पुलावरून उडी घेतल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. प्रज्वल सोम ढेंगे (वय २५, रा. परसोडी) असे संबंधित तरुणाचे नाव आहे. प्राप्त माहितीनुसार, प्रज्वल ढेंगे यांनी आंभोरा येथील पुलावरून नदीपात्रात उडी घेतल्याची माहिती कुटुंबीयांना मिळताच त्यांनी तात्काळ अड्याळ पोलीस ठाण्यात धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी विलंब न लावता घटनास्थळी पोहोचून शोधकार्य सुरू केले आहे. सध्या नदीपात्रात कसून शोधमोहीम राबविण्यात येत असून पाण्याचा वेगवान प्रवाह आणि वाढता अंधार यामुळे बचाव पथकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. तरीही प्रशासन आणि पोलीस यंत्रणा युद्धपातळीवर प्रयत्न करत आहेत. या घटनेमुळे परसोडी व आंभोरा परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि कोणतीही अप्रमाणित माहिती प्रसारित न करण्याचे आवाहन केले आहे. घटनेचा अधिक तपास अड्याळ पोलीसांकडून सुरू आहे.

## आष्टेडू मर्दानी आखाडा विभागीय स्पर्धेत 'शौर्य आत्मरक्षा केंद्रा'च्या १३ विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी विजय निखाते**

श्री छत्रपती शिवाजी महाराज ज यंतीनिमित्त अष्टेडु आखाडा असोसिएशन यांच्या वतीने आयोजित शिवकालीन मर्दानी खेळाच्या विभागीय स्पर्धेमध्ये 'हिंदू गर्जना प्रतिष्ठान' द्वारा संचालित शौर्य आत्मरक्षा प्रशिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत नेत्रदीपक कामगिरी केली आहे. या स्पर्धेत केंद्रातील एकूण १३ विद्यार्थ्यांनी पदके पटकावून संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. शिवजयंतीच्या उत्सवाचे औचित्य साधून आ योजित केलेल्या या स्पर्धेत विविध स्तरांवरील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये शौर्य आत्मरक्षा प्रशिक्षण





केंद्राच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्धता आणि उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांची नामावली: मेडल प्राप्त करणाऱ्या यशस्वी खेळाडूंमध्ये आराध्या इंगोले, नितेश नगरधने, शुभ्रा जोशी, अनन्या हराळ, ओवी चिरडे, स्वास्तिका मौर्य, तनिष्क जयस्वाल, रचित घड्याळे, शिवराज घुमनर, ऋतुंबरा कवाने, अनुष्का नगरधने, मृगनयनी शेंडे आणि स्वरांजली खोलगाडगे यांचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या वयोगटात आणि प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत पदके मिळवली. मार्गदर्शकांचे प्रोत्साहन: विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांचे मार्गदर्शक हिंदूगर्जना प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष श्री. सागर सरनाईक आणि प्रशिक्षक ग जा न न घुमनर यांचे मोलाचे मा र्गदर्शन व विशेष सहकार्य लाभले. प्रशिक्षण केंद्रात मिळणारे दर्जेदार प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांची जिद्द यामुळेच हे यश संपादन करता आले, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. या यशाबद्दल हिंदू गर्जना प्रतिष्ठानचे प दाधिकारी, पालक आणि क्रीडाप्रेमींकडून विद्यार्थ्यांचे व प्रशिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कोंढाळी ५७४ माऊली भक्तांनी नोंदला सहभाग

## माधान येथे संत श्री गजानन महाराज ध्यान मंदिर कोंढाळी पालखीचे भव्य आगमन

**▸विदर्भ केसरी। चांदूर बाजार /-**

तालुक्यातील माधान नगरी आज भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाली. संत श्री गजानन महाराज ध्यान मंदिर, कोंढाळी येथून निघालेल्या पालखीचे माधान येथे भव्य-दिव्य स्वागत करण्यात आले. टाळ-मृदंगाच्या गजरात, गण गण गणात बोते" च्या जयघोषात संपूर्ण गाव दुमदुमून गेले होते. या पालखी सोहळ्यात कोंढाळी येथील व तालुक्यातील आसपासच्या गावांतील तब्बल ५७४ माऊली भक्त सहभागी झाले होते. तर माधान येथील व आजू बाजू गावातील भक्तांनी मोठ्या श्रद्धेने दर्शनाचा लाभ घेतला. भक्तांच्या उत्साहामुळे माधानमध्ये आध्यात्मिक उर्जा आणि भक्तिभावाचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. कोंढाळी येथे पूर्वी झाडाझुडपांनी व घाणीने व्यापलेल्या जागेचे रूपांतर



आज एका भव्य आणि दिव्य ध्यान मंदिरात झाले आहे. या ठिकाणी उभारण्यात आलेली संत श्री गजानन महाराजांची सुमारे सहा फूट उंच दिव्य मूर्ती महाराष्ट्रातील एकमेव ठिकाणी असल्याचे विशेष महत्त्व आहे. लाखो भाविक या ध्यान मंदिरात येऊन दर्शनाचा लाभ घेतात. या पवित्र संकल्पनेतून जीवन जवंजाळ, राजेश गाडगे व सर्व संस्थेचे पदाधिकारी व सेवेकरी यांच्या पुढाकाराने शेगाव वारीचे आयोजन करण्यात आले. वारीदरम्यान वरखेड येथील आडकुजी महाराजांचे दर्शन घेऊन पुढे शेगाव येथे संत गजानन महाराज मंदिरात सर्वांनी प्रस्थान केले. तेथून सायंकाळी संत श्री गुलाबराव महाराज व संत गजानन महाराजांच्या पावन स्मृतीस्थळी भेट देत पालखी माधान येथे आगमन पावली. माधान येथे आगमन होताच गजानन महाराज संस्थानतर्फे सर्व वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले.

चहा-पाणी व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर जीवन आधार संस्थेचे सहसचिव सुयोग गोरले, सागर सवळे व गोरले परिवार यांच्या वतीने सर्व वारकऱ्यांना आइस्क्रीमचे वाटप करण्यात आले. तसेच रमेशपंत जवंजाळ, सौ. सुरेखाआई जवंजाळ व संपूर्ण जवंजाळ परिवार आणि मित्र परिवार यांच्या वतीने महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन संत गजानन महाराज ध्यान मंदिराचे अध्यक्ष जीवन जवंजाळ, राजेश गाडगे,पंकज महाराज पोहोकार, सुभाष सांगोले, बूटे सर, , पवार महाराज, अंजलीताई गाडगे, मनीषाताई जवंजाळ, विकास कामडी , संजय सवई, मनीष नानोटकर, कुणाल भागे, घाटोळे काका, योगेश राऊत आदींच्या सहकार्याने पार पडले. भक्ती, सेवा आणि एकतेचा सुंदर संदेश देणारा हा सोहळा माधानच्या इतिहासात स्मरणीय ठरला आहे. संतांच्या कृपेने समाजात सद्भावना, सेवा आणि अध्यात्माची ज्योत सतत प्रज्वलित राहो, अशीच भावना सर्व माऊली भक्तांनी व्यक्त केली.

# अनिल मोहड यांना समाजभूषण पुरस्कार

## निवारा पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटकडून पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

यवतमाळ : समाजातील गोरगरिबांच्या सामाजिक व आरोग्यविषयक समस्या सोडविण्यासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने निवारा पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट, यवतमाळ यांच्या वतीने समाजभूषण पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला.

निवारा फाउंडेशनच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक न्याय या क्षेत्रांत विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. शोषित, दुर्लक्षित आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांसाठी संस्था अनेक वर्षांपासून सातत्याने कार्यरत आहे. समाजात सकारात्मक बदल घडवून आणणे आणि नवचैतन्य निर्माण करणे हा फाउंडेशनचा प्रमुख हेतू असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.



यंदाचा समाजभूषण पुरस्कार नांझा येथील समाजसेवक श्री अनिल मोहड यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नातू तथा साहित्यिक श्री सचिन साठे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सागर कळणे यांनी भूषविले.

मंचावर चंदन हातागळे, सुनीता नाटकर, प्रा. संजय नाटकर तसेच संजय कांबळे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते श्री. मोहड यांना शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

पुरस्कार स्वीकारताना अनिल मोहोड म्हणाले, "हा सन्मान माझ्यासाठी केवळ गौरव नाही, तर समाजासाठी अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा आहे. या पुरस्कारामुळे माझे मनोधैर्य वाढले असून भविष्यात समाजातील विविध प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी अधिक जोमाने प्रयत्न करणार आहे."

कार्यक्रमास विविध क्षेत्रातील नागरिकांची उपस्थिती लाभली होती. संपूर्ण सोहळा उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

## त्या केंद्राचे संचालक निलंबित

■ बीड : तालुक्यातील कुर्ला येथील यशवंत विद्यालय परीक्षा केंद्रावर दहावीच्या विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था चक्क शाळेच्या छतावर मंडप टाकून केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला होता. या प्रकरणी शिक्षण विभागाने कडक पाऊल उचलत परीक्षा केंद्र संचालक अभिषेक राऊत यांना पदावरून हटवले असून, संस्थेने त्यांना निलंबित केले आहे. यासंदर्भात वृत्त प्रकाशित केल्यावर विभागीय मंडळाच्या अध्यक्षांनीही शाळेत जाऊन पाहणी केली होती. परीक्षा केंद्रावर पुरेशा वर्गखोल्या नसतानाही केंद्र संचालकांनी शिक्षण विभागाच्या बैठकीत ही माहिती लपवून ठेवली.

## महत्त्वाचे

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी अस्मिता परिषद-2026

**▸विदर्भ केसरी। सतीश भालेराव नागपूर:-**



सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाच्या मूल्यांचा जागर करण्याच्या उद्देशाने "डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी अस्मिता परिषद – 2026" या उपक्रमाची घोषणा करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक जागृती, संविधानिक मूल्यांची जपणूक आणि व्यक्तिमत्व विकासाला चालना देणे हा परिषदेमागील मुख्य हेतू आहे. परिषदेच्या माध्यमातून विविध शैक्षणिक, सामाजिक आणि प्रेरणादायी विषयांवर मार्गदर्शनपर सत्रे, चर्चासत्रे आणि संवाद कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. कार्यक्रमात तज्ज्ञ वक्ते, अभ्यासक आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. भारताचे संविधान निर्माते, महान विचारवंत आणि समाज सुधारक Dr. Babasaheb Ambedkar यांच्या विचारसरणीचा वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, तसेच शिक्षणाद्वारे स्वाभिमान व सामाजिक जबाबदारीची जाणीव दृढ करणे हा परिषदेचा प्रमुख संदेश आहे. सदर कार्यक्रम Nagpur येथे घेण्याचे योजिले असून Dhyeya Bahuuddeshi Sanstha या संस्थेमार्फत आयोजन करण्यात येणार आहे. संस्थेचे अध्यक्ष सुबोध जंगम (सत्य) यांनी ही माहिती देताना, परिषदेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेरणा, दिशा आणि सामाजिक जाणीव मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे.



### गाडगेबाबा जयंतीनिमित्त पिंप्री काथरगावमध्ये स्वच्छतेचा उपक्रम

**▸विदर्भ केसरी। विदर्भ केसरी | संग्रामपूर -**

मुख्यमंत्री पंचायत राज अभियानाच्या निमित्ताने आणि संत गाडगे बाबा जयंतीचे औचित्य साधून पिंप्री काथरगाव गट ग्रामपंचायतीच्या वतीने स्वच्छतेचा संदेश देणारा प्रेरणादायी कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामस्वच्छतेचा संकल्प करत गावात व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली तसेच स्वच्छता दिंडी काढून जनजागृती करण्यात आली. यावेळी गोपाल भाऊ इंगळे यांनी गाडगेबाबांची वेशभूषा परिधान करून गावात भेट दिली. त्यांनी शालेय विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत प्रत्यक्ष ग्रामस्वच्छतेत सहभाग घेतला. "स्वच्छ गाव, सुंदर गाव" हा संदेश देत नागरिकांना परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाला गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ. सुवर्णाताई गणेश टापरे, उपसरपंच कुसुमताई डाखोडे, ग्रामपंचायत सदस्य कडू कांबळे, विलास कंकाळ, शीलाताई मुंडे, पार्वताबाई हातेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच वाघमारे गुरुजी, गुहाळ गुरुजी, बुंदे गुरुजी, अंगणवाडी सेविका खराटे ताई, अंगणवाडी मदतनीस कंकाळ ताई व मुंडे ताई यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. याशिवाय शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धम्मपाल हातेकर, नाना पाटील, संजय मुंडे, संजय नांदोकर, जगन्नाथ बावस्कर, शीलाबाई हातेकर, मीराबाई चव्हाण, जयश्री कंकाळ, नंदाताई टापरे, ज्योतीताई नांदोकर, शकुंतला बावस्कर, सोपान कंकाळ, आदित्य सरदार, सुपेश डाखोडे, चेतन टापरे, सुयोग मेतकर, भगवान मुंडे, गौरव मुंडे, सुपेश खराटे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या पुढाकारामुळे गावात स्वच्छतेबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### सात वर्षांच्या रैय्यानने ठेवला पहिला रोजा

**▸विदर्भ केसरी। विदर्भ केसरी | संग्रामपूर -**



तालुक्यातील पातुर्डा बु येथे सुरू असलेल्या माह-ए-रमजानच्या पवित्र महिन्यात अवघ्या सात वर्षांच्या रैय्यान या चिमुकल्याने पहिला रोजा पूर्ण करत श्रद्धा आणि संयमाचे उदाहरण घालून दिले. लहान वयात दाखविलेल्या जिद्दीमुळे गावात त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. रैय्यान हा पातुर्डा येथील माजी उपसरपंच पप्पू पठाण यांचा सुपुत्र आहे. घरातील सदस्य रोजा पाळत इबादत करत असताना रैय्याननेही रोजा ठेवण्याची इच्छा व्यक्त केली. वय लहान असल्याने कुटुंबीयांनी सुरुवातीला त्याला समजावण्याचा प्रयत्न केला; मात्र त्याच्या ठाम इच्छेमुळे अखेर परवानगी देण्यात आली. रैय्यानने कुटुंबासोबत सहरी करून दिवसभर संयमाने रोजा पाळला. संध्याकाळी मगरिबच्या अजाननंतर इफ्तार करत त्याने आपला पहिला रोजा पूर्ण केला. आपल्या पहिल्या रोज्यादरम्यान देशात अमन-चैन, बंधुभाव आणि समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना त्याने केल्याचे वडील पप्पू पठाण यांनी सांगितले. रैय्यानच्या या कृतीबद्दल कुटुंबीयांनी त्याचा सत्कार करून हार घातला तसेच रोख पारितोषिक देऊन अभिनंदन केले. लहान वयात दाखविलेली श्रद्धा, शिस्त आणि धार्मिक संस्कार यामुळे रैय्यानचा आदर्श इतर बालकांसाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### वर्धेत वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस

**▸विदर्भ केसरी। वर्धा,**

विदर्भात दोन दिवस अवकाळी पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला होता. सोमवारी पहाटेच्या सुमारास वर्धेत तर ग्रामीण भागात काही ठिकाणी पावसासह गारपीट झाली होती. यातच मंगळवारी सायंकाळी ६.२० वाजताच्या सुमारास वर्धेत वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. अचानक वातावरणातील बदल आणि अवकाळी पावसामुळे लहान व्यापाऱ्यांची मोठी तारांबळ उडाली. सध्या शेतात चणा, गहू यासारखी पीक आहेत. हे पीक काढणीला आले असून अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावण्याची शयता आहे. सोमवारी अल्लीपूर, हिंगणघाट तसेच परिसरातील अन्य गावांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली. अल्लीपूर आणि काही गावांमध्ये गारपीटही झाले. आज मंगळवारी सायंकाळी ६.२० वाजताच्या सुमारास अचानक वातावरणात बदल झाला आणि पावसाने हजेरी लावली. दोन दिवसांपूर्वी वातावरणात उष्णतामान दिसून येत असतानाच अवकाळीने पुन्हा गारवा निर्माण केला आहे.

# मुख्याध्यापकास १४ वर्षांची शिक्षा

## विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या मुख्याध्यापकास एकूण १४ वर्षाची कठोर शिक्षा व ७५ हजाराचा ठोठावला दंड

### जिल्हा व सत्र न्यायाधीश सौ.सरोज एन. माने-गाडेकर यांनी ३ खटल्यात आरोपीला सुनावल्या वेगवेगळ्या शिक्षा

**▸विदर्भ केसरी। हिंगोली-**



जिल्ह्यातील शिक्षकी पेशाला काळीमा फासणाऱ्या तोंडापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या तत्कालीन नराधम मुख्याध्यापकास एकूण तीन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्या प्रकरणी हिंगोली जिल्हा व सत्र न्यायाधीश सौ.सरोज एन. माने-गाडेकर यांनी एकाचवेळी तीन खटल्यांमध्ये १४ वर्ष सश्रम कारावास व ७५००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

प्राप्त माहितीनुसार, कळमनुरी तालुक्यातील तोंडापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील एकूण ०६ मुली व ०३ मुले हे नवोदय व स्कॉलरशिप परीक्षेची तयारी करीत होते. त्यादरम्यान उन्हाळी सुट्यांमध्ये शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक आरोपी भगवान पंडीतराव अवचार हा सदर विद्यार्थ्यांचे शाळेमध्ये क्लास घ्यायचा. त्यावेळेस एकेका मुलीस वैयक्तिकरित्या भांडार रूममध्ये बोलावून त्यांच्यासोबत अश्लिल कृत्य करायचा. एकूण ०६ पीडितांपैकी ०३ पीडित मुलींनी आखाडा बाळापूर पोलिस स्टेशनमध्ये तशा फिर्यादी दाखल केल्या. त्यानुसार आरोपी मुख्याध्यापक भगवान अवचार याचे विरुद्ध आखाडा बाळापूर पोलीस स्टेशन मध्ये कलम ३५४, ५०६ भादवी, कलम ९(एफ), १०, ११, १२, पोक्सो व अ.जा.ज.अ.प्र. कायद्यान्वये गुन्हे नोंद करण्यात आले. सदर प्रकरणी तपास अधिकारी उपविभागीय पोलीस अधिकारी यतीश देशमुख, विवेकानंद वाखारे, किशोर कांबळे तसेच सपो निरीक्षक बोधनापोड, शिवाजी बोंडले यांनी सखोल तपास करून हिंगोली जिल्हा व सत्र न्यायालयात या तीन विशेष खटल्यात दोषारोप पत्र दाखल केले होते. सदर तिन्ही वेगवेगळ्या गुन्ह्यातील खटल्यांवर एकाचवेळी सुनावण्या घेऊन हिंगोली जिल्हा व सत्र न्यायाधीश सौ.सरोज एन. माने-गाडेकर यांनी आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडापूर येथील तत्कालीन नराधम मुख्याध्यापक आरोपी नामे भगवान पंडीतराव अवचार, वय ५६, रा. नांदेड यास दोषी ठरवत कलम ३५४ भादवी मध्ये ५ वर्षे सश्रम कारावास तसेच २५००० रुपये दंड(दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावास), कलम ५०६ भादवी मध्ये १ वर्ष सश्रम कारावास तसेच १०,००० रुपये दंड (दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास), कलम ९(एफ) पोक्सो मध्ये ०५ वर्षे सश्रम कारावास व २५,००० रुपये दंड( दंड न भरल्यास १ वर्ष शश्रम कारावास), कलम ११ पोक्सो मध्ये ०३ वर्षे सश्रम कारावास व १५,००० रुपये दंड(दंड न भरल्यास ०८ महिने सश्रम कारावास) अशाप्रकारे एकूण तीनही प्रकरणांमध्ये शिक्षा दिल्यात. सर्व शिक्षा एकत्र भोगण्याचा आदेश दिला. तसेच सदर प्रकरणातील पीडित मुलींना शासकीय योजनेअंतर्गत २५ हजार रुपये ही आर्थिक मदत म्हणून देण्याचे आदेशही दिले. वरील तिन्ही प्रकरणात जिल्हा सरकारी वकील एन.एस. मुटकुळे यांनी युक्तिवाद सादर केला. पीडित मुलींची साक्ष, तपाशीक अंमलदार तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक पिराजी किल्लारी यांची साक्ष महत्वपूर्ण ठरली. सदर प्रकरणी सहाय्यक सरकारी वकील एस.डी. कुटे व श्रीमती सविता एस. देशमुख (जाधव) तसेच कोर्ट पैरवी सुनीता धनवे यांनी सहकार्य केले.

## अतिक्रमणधारकांवर पालिकेची कारवाई

**▸विदर्भ केसरी। वर्धा,**

शहरातील अतिक्रमण हटविण्याची मोहीम नगरपालिकेने हाती घेतली आहे. मंगळवार २४ गांधी पुतळा ते प्रियदर्शिनी इंदिरा गांधी पुतळा, केसरीमल कन्या शाळा परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील अतिक्रमण काढण्यात आले. तर २४ अतिक्रमणधारकांचे साहित्य जप्त करण्यात आले. पालिकेच्या या कारवाईमुळे रस्त्यांनी मोकळा श्वास घेतल्याचे चित्र मंगळवारी पहायला मिळाले. शहरातील मुख्य मार्गांवर वर्षानुवर्षांपासून सर्वत्र अतिक्रमण बघायला मिळत आहे. यात रस्त्यापर्यंत हातगाड्या लावून फळ, भाजीपाला, खाद्यपदार्थ व अन्य वस्तूंची विक्री केली जाते. यातच ग्राहकांचीही गर्दी होत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. केसरीमल कन्या शाळा परिसरातील अतिक्रमण वारंवार काढल्यानंतरही व्यावसायिकांकडून पुन्हा रस्त्यावर व्यवसाय थाटून अतिक्रमण केले जाते. यामुळे मार्ग अरुंद होऊन रहदारीला नित्याने अडथळा होतो.

# कर्जमाफीच्या निर्णयाकडे शेतकऱ्यांचे लक्ष

**▸विदर्भ केसरी। पांढरकवडा :**

शासनाच्यावतीने शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचे आश्वासन दिले आहे.त्याकरिता ३० जूनपर्यंत शेतकऱ्यांना प्रतीक्षा करावी लागणार आहे.त्यादृष्टीने शासनाने माहिती गोळा करण्याचे काम अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचले आहे.मात्र,नेहमीप्रमाणे याही कर्जमाफीत नियमित अर्थात चालू पीककर्जधारकांना न्याय मिळेल काय? हा प्रश्न शेतकरी चर्चित आहेत.सरकारने २०१५ पासून दोनदा कर्जमाफी केली खरी,परंतु पारदर्शकता नसल्याने व नियमांना तिलांजली दिल्याने बरेच शेतकरी अजूनही २०१५ पूर्वीचेसुद्धा थकीत कर्जदार कर्जाच्या खाईत खितपत आहेत.बरेचदा कर्जदारांपेक्षा बँकांनाच कर्जमाफीतून लाभ झाल्याचे बोलल्या जाते.त्याचे कारणही अभ्यासांती पुढे येते की,खरे शेतकरी पीककर्जाच्या योजनेतून वगळले गेले आहेत.काहींना पुनर्गठनाच्या




योजनेमुळेसुद्धा कर्जमाफीचा लाभ झाला नाही.ही वास्तविकता शासनाने व अधिनस्त कमिटीने नजरेसमोर ठेवून पीककर्ज योजना व्यापकपणे राबविणे गरजेचे आहे.मार्च स्तरावर कर्जवसुली प्रभावित होणार असल्यामुळे शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करण्याची मागणीही शासनाकडे करण्यात आली आहे.शासनाच्या धोरणानुसार जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून १ एप्रिलपासून पीककर्जाचे वाटप होते. ते ३१ मार्चपूर्वी शून्य व्याजदराने भरावे लागते.नियमित कर्जदार कर्जाची भीती डोक्यात ठेवून दुष्काळ,नापिकी किंवा सुलतानी संकट आलं तरी ३१ मार्चपूर्वी पीककर्ज भरण्याचा शेतकरी पुरेपूर प्रयत्न करतो.परंतु,शासनाने जाहीर केलेली कर्जमाफी डोळ्यांसमोर असल्याने व यात नेहमीच थकीत कर्जदारांनाच न्याय मिळत असल्याने मीसुद्धा यावेळी कर्ज भरणार नाही,असे म्हणणाऱ्यांची संख्या आर्णी-घाटंजी-केळापूर विधानसभा मतदारसंघात वाढत आहे.त्यामुळे मार्च स्तरावर पीककर्ज भरणाऱ्यांची संख्या रोडावणार,असे स्पष्ट संकेत चर्चेतून उमटत आहेत.

■ **शासनाने नियमित पीककर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर संपूर्ण कर्जमाफी द्यावी.जेणेकरून सत्याला न्याय मिळेल व शेतीला आधार होईल.कर्जाशिवाय शेती कसण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांच्या शेतमालाचे हमीभाव वाढविणे व आर्णी-घाटंजी-केळापूर विधानसभा मतदारसंघात शेतकऱ्यांच्या हक्काची बाजारपेठ स्थानिक ठिकाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.**
**-इंजि.अजय तुळशिदास आत्राम**
**०८० - आर्णी - केळापूर,विधानसभा**
**महाराष्ट्र आ.प्रदेश काँग्रेस कमिटी सरचिटणीस (महाराष्ट्र)**

## 'लाडकी बहीण', 'तीर्थदर्शन' योजना केवळ निवडणुकीचा जुमला!

**▸विदर्भ केसरी।मुंबई : प्रतिनिधी**

निवडणुकीपुरता लाडक्या बहिणींचा आणि देवदर्शनाचा जप करणा-या महायुती सरकारचा खरा चेहरा आता समोर आला आहे. बहुमत मिळताच सरकारने 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन' योजनेला 'खो' दिला असून, आता भाविकांनी स्वत:च्या पैशानेच देवाकडे जावे, अशी सरकारची भूमिका दिसते.

सतेज पाटील यांनी सरकारच्या आर्थिक नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना सांगितले की, पुरवणी मागण्यांवरून हे स्पष्ट होते की राज्याची तिजोरी रिकामी झाली आहे. लाडक्या बहिणींचे अनुदान थकले असून आता 'केवायसी'च्या नावाखाली तांत्रिक अडचणी काढून त्यांचे पैसे कापण्याचे कारस्थान सुरू आहे. अर्थ खात्याला स्पष्ट सूचना आहेत की, कोणत्याही फाईलमध्ये त्रुटी काढून ती परत पाठवा, जेणेकरून पैसे देण्याची वेळ येऊ नये. लाडक्या कंत्राटदारांची बिले काढली जात आहेत, पण संजय गांधी निराधार योजना आणि सामान्य शेतक-यांच्या अनुदानासाठी सरकारकडे पैसे नाहीत.

■ **..तरीही हमीभाव वाढवण्यास तयार नाही**

कापूस, सोयाबीन आणि कांद्याच्या घसरलेल्या भावावरून सरकारला धारेवर धरले. हायकोर्टाने आदेश देऊनही केंद्र सरकार हमीभाव वाढवण्यास तयार नाही. अवकाळी पावसाचा फटका बसलेल्या शेतक-यांना तातडीने मदत मिळणे गरजेचे आहे. समृद्धी महामार्गावरील समस्या सुटल्या नसताना शक्तिपीठ महामार्गाचा हट्ट कशासाठी? असा सवाल करत त्यांनी १२ जिल्ह्यांतील शेतक-यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला.

## फोनच बनला मृत्यूचे कारण!

**▸विदर्भ केसरी। महोबा,**

डिजिटल युगाच्या या वेडामुळे निष्पाप जीवांचे नुकसान होत आहे. महोबा येथून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे, जिथे मोबाईल फोन न मिळाल्याने नाराज झालेल्या एका सातवीच्या विद्यार्थिनीने आत्महत्या केली.

तिच्या मोठ्या बहिणीने फोन देण्यास नकार दिल्याने १४ वर्षीय प्राचीने तिच्या खोलीत गळफास घेतला. या घटनेने केवळ एका कुटुंबालाच उद्ध्वस्त केले नाही तर समाजासाठीही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

ही संपूर्ण घटना कुलपहार पोलिस स्टेशन परिसरातील पोला परिसरात घडल्याचे वृत्त आहे. कमलेश राजपूत यांची मुलगी प्राची ही इयत्ता सातवीची विद्यार्थिनी होती. घटनेच्या वेळी तिची मोठी बहीण, बीएची विद्यार्थिनी, काजल तिच्या मोबाईलवर शिकत होती. प्राचीने तिच्या बहिणीचा फोन मागितला, परंतु अभ्यासात व्यस्त असलेल्या काजलने नकार दिला. यामुळे तिला दुखापत झाली. हा छोटासा आग्रह मृत्यूचा सापळा बनेल याची कोणीही कल्पना करू शकत नव्हते. संतापलेल्या प्राचीने स्वतःला तिच्या खोलीत कोंडून घेतले. बराच वेळ आतून आवाज न आल्याने तिच्या आईला आणि कुटुंबातील सदस्यांना काहीतरी वाईट घडल्याची भीती वाटली.


शेजाऱ्यांच्या मदतीने जेव्हा दरवाजा तोडण्यात आला तेव्हा सर्वांना धक्का बसला. प्राचीचा मृतदेह फासावर लटकलेला होता. कामावर बाहेर गेलेल्या वडिलांना जेव्हा त्यांच्या मुलीच्या मृत्यूची बातमी मिळाली तेव्हा त्यांच्या पायाखालून जमीन सरकली. माहिती मिळताच, पोलीस घटनास्थळी पोहोचले, त्यांनी मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवला. पोलीस आता या प्रकरणाच्या प्रत्येक पैलूची चौकशी करत आहेत. तथापि, ही घटना आजच्या पिढीमध्ये संयमाचा अभाव आणि मोबाईल फोनचे वाढते वेड कसे घातक ठरू शकते याचा एक प्रभावी धडा देते.

# जीवघेण्या आजाराशी झुंज देणाऱ्या तरुणाला खासदार संजय देशमुख यांचा दिलासा

### पंतप्रधान सहायता निधीतून १.९५ लाखांची मदत मंजूर....

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यातील आमदरी येथील २१ वर्षीय पवन सिताराम पोटे याच्या आयुष्यात अचानक वादळ आले, जेव्हा त्याला B-Cell Acute Lymphoblastic Leukemia (Blood Cancer) असल्याचे निदान झाले. उमेद, स्वप्ने आणि भविष्याची स्वप्ने डोळ्यांत साठवलेल्या तरुणावर जीवघेणा आजार ओढवल्याने पोटे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. उपचारासाठी पवनला Dr. Ravindra Kodlikeri Memorial Hospital येथे दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी सुमारे ३,९५,००० रुपयांचा खर्च सांगितला. अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती असलेल्या कुटुंबासाठी ही रक्कम परवडणारी नव्हती. मुलाच्या जीवासाठी धडपड करणाऱ्या पालकांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले. अशा कठीण प्रसंगी पोटे कुटुंबाने





यवतमाळ - वाशिम लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजयभाऊ देशमुख यांची भेट घेऊन मदतीची आर्त विनंती केली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन खासदार संजय भाऊ देशमुख यांनी तात्काळ गजानन कदम यांना पंतप्रधान सहायता निधीकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. या प्रयत्नांना यश मिळाले आणि पवनच्या उपचारासाठी पंतप्रधान सहायता निधीतून तब्बल १,९५,५०० रुपयांची मदत मंजूर झाली. मंजुरीपत्र प्राप्त होताच पोटे कुटुंबाच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले. "अशा कठीण प्रसंगी मदतीचा हात देणारे खासदार संजय भाऊ देशमुख आमच्यासाठी देवदूत ठरले. त्यांचे उपकार आम्ही कधीही विसरणार नाही," अशा शब्दांत कुटुंबीयांनी कृतज्ञता व्यक्त केली. जीवन-मरणाच्या संघर्षात उभ्या असलेल्या एका तरुणाला वेळेवर मिळालेला हा आर्थिक दिलासा म्हणजे आशेचा किरण ठरला आहे. लोकप्रतिनिधी म्हणून संवेदनशीलता आणि तत्परता दाखवणाऱ्या खासदारांच्या या कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# विषमुक्त शेतीकडे मूर्तिजापूर तालुक्याचे खंबीर पाऊल

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

## ७५ शेतकऱ्यांचे तीन दिवसीय प्रशिक्षण संपन्न. पाणी फाउंडेशनच्या मार्गदर्शनाखाली निसर्गपूरक शेतीचा संकल्प; ग्रामपुत्र परिवाराचा पुढाकार.

रासायनिक शेतीच्या विळख्यातून बाहेर पडून निसर्गपूरक आणि शाश्वत शेतीकडे वळण्यासाठी मूर्तिजापूर तालुक्यातील ७५ शेतकऱ्यांनी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. पाणी फाउंडेशनच्या वतीने बडनेरा (दुर्गापूर) येथील कृषी विज्ञान केंद्रात आयोजित करण्यात आलेले तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिर नुकतेच उत्साहात संपन्न झाले. २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान चाललेल्या या शिबिरात शेतकऱ्यांनी 'विषमुक्त अन्ना'साठी कंबर कसली आहे. शासकीय यंत्रणांचा सक्रिय सहभाग या उपक्रमाला कृषी विभाग, उमेद, आत्मा विभाग आणि महाराष्ट्र शासनाच्या विविध यंत्रणांचे मोलाचे



सहकार्य लाभले. पाणी फाउंडेशनच्या अनुभवी टीमने शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कृतीतून आणि तांत्रिक माहितीद्वारे मार्गदर्शन केले. शेतीचा खर्च कमी करून उत्पादन कसे वाढवता येईल, यावर या प्रशिक्षणात प्रामुख्याने भर देण्यात आला.

रासायनिक शेतीचे दुष्परिणामः चिंतेचा विषय प्रशिक्षण सत्रात तज्ज्ञांनी रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे ओढवलेल्या संकटावर प्रकाश टाकला. यामध्ये प्रामुख्याने खालील मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली:

जमिनीचा पोतः रासायनिक द्रव्यांमुळे मातीचा कस कमी होऊन जमीन नापीक होत आहे.

आरोग्य संकटः अन्नामध्ये विषारी अंश मिसळल्यामुळे गंभीर आजारांचे प्रमाण वाढत आहे.

पर्यावरण ऱ्हास, जलस्रोत प्रदूषित होत असून निसर्गाचे चक्र बिघडत चालले आहे.

उपस्थित शेतकऱ्यांनीही कबूल केले की, रासायनिक शेतीमुळे खर्च वाढत असून जमिनीची सुपीकता धोक्यात आली आहे. विषमुक्त शेतीसाठी पंचसूत्री प्रशिक्षणार्थी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक असलेल्या महत्त्वपूर्ण बाबींचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले, ज्यात प्रामुख्याने:

१. जैविक खत निर्मिती आणि नैसर्गिक कीड नियंत्रण.
२. योग्य पीक नियोजन आणि पाणी व्यवस्थापन.
३. मृदा संवर्धन (माती वाचवा) मोहिमेचे महत्त्व.
४. स्थानिक संसाधनांचा वापर करून खर्च कमी करणे.

ग्रामपुत्र परिवाराचा यशस्वी पुढाकार तालुक्यातील शेतकऱ्यांना संघटित करण्यासाठी आणि या चळवळीला गती देण्यासाठी *'ग्रामपुत्र परिवार'*ने विशेष कष्ट घेतले. या मोहिमेमुळे शेतकऱ्यांमध्ये नवा उत्साह संचारला असून, भविष्यात मूर्तिजापूर तालुका विषमुक्त अन्न निर्मितीचे केंद्र बनेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. निसर्गाचा समतोल राखून, विषमुक्त अन्नाद्वारे निरोगी समाज आणि समृद्ध शेतकरी घडवण्याच्या या आंदोलनाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू | TODAY

# चंद्रपूर

GOOD MORNING

## रब्बी पिकांची २०२५-२६ सुधारित पैसेवारी जाहीर

**विदर्भ केसरी प्रतिनिधी**

गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्यात एकूण 1689 गावे असून रब्बी पिकाची गावे 148 आहेत. त्यापैकी रब्बी गावामध्ये पीके नसलेली गावे 88 आहेत. सदर रब्बी पिक असलेल्या गावापैकी 50 पैशाचे आत पैसेवारी असलेले 0 असून 50 पैशाचे वर पैसेवारी असलेल्या एकूण रब्बी पिक असलेल्या गावांची संख्या 60 आहेत. अशा प्रकारे एकूण 60 गावांमधील रब्बी पिकाची सुधारित पैसेवारी जाहीर केलेली आहे. गडचिरोली जिल्ह्याची रब्बी पिकाची 2025-2026 या वर्षाची सुधारित पैसेवारी 0.67 रु. पै. आहे.असे जिल्हाधिकारी, अविश्यांत पंडा यांनी कळविले आहे.

## संक्षिप्त



### जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेचे कामबंद आंदोलन

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

गडचिरोली : गडचिरोली पंचायत समिती समोर लिपिक सह वर्गाचा बेमुदत काम बंद आंदोलन आज दिनांक 23 फेब्रुवारी पासून सुरू असून त्यांच्या मागण्या पुढील प्रमाणे आहेत..१) लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांना चौथा वेतन आयोगापासूनची वेतनत्रुटी दूर करुन सुधारीत वेतन श्रेणी लागू करणे. पदनामात बदल करणे व पदोन्नतीचे साखळी कमी करणे. २) सर्वांना जशास तशी जूनी पेंशन योजना लागू करणे. ३) १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपाच्या प्रतिक्षा सुचीवर असलेल्या सर्वांना जुनी पेन्शन लागू करणे. ४) जिल्हा परिषद मधील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे समावेशन मृद व जलसंधारण विभागामध्ये न करणेबाबत. या कामबंद आंदोलन स्थळी पंचायत समिती गडचिरोली कार्यकारिणी श्रीमती लिनाताई येडलावार, अध्यक्ष शेषराव मेश्राम श्रीमती नुतन सपाटे सचिव, श्रीमती कालींदा वाळवे कार्यकारी अध्यक्ष,श्रीमती हेमलता जल्लारपु, प्राजक्ता बुरडकर कोषाध्यक्ष, सहसचिव श्रीमती वंदना बघेल उपाध्यक्ष, श्रीमती ए. पतकालवार, जीवन पेंदोर, वंदना पी. मडावी, उषा वेलादी तालुका महिला उपाध्यक्ष, प्रमुख मागदर्शक,तालुका संपर्क प्रमुख तालुका महिला संपर्क प्रमुख तालुका संघटक या सर्वांनी पंचायत समितीच्या आवारात कामबंद आंदोलन सुरू केले असून जो पर्यंत मागण्या मान्य केल्या जात नाही तो पर्यंत आंदोलन सुरू राहील असे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले आहे.



### कुरखेडा तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांचे काम बंद आंदोलन

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे**

कुरखेडा : कुरखेडा तालुक्यातील सहाय्यक गट विकास अधिकारी यांचे मनमानी कारभाराला कंटाळून त्यांचे वर प्रशासकीय कारवाई प्रास्तावित करनेस्तव आज दिनांक 23 फेब्रुवारी पासून पूर्ण जिल्ह्यातील ग्रामपंचायत अधिकारी यांनी काम बंद आंदोलन उभारले. कुरखेडा पंचायत समिती अंतर्गत डी. बी. उराडे हे पदोनत्ती ने सहाय्यक गट विकास अधिकारी पदावर दि. 30 /10 / 2025 रोजी रुजू झाले. रुजू झाल्या झाल्याच त्यांनी ग्रामपंचायत अधिकारी यांची आर्थिक खंडणी, वसुलीसाठी अधिकार - नियमबाह्य कायदेशीर कृती अमलात आणून मानसिक छळ, विनयभंगवादी गैरकृत्य करित असल्याने ग्रामपंचायत अधिकारी युनियन (dne 136)जिल्हा शाखा गडचिरोली यांचे वतीने मा. प्रधान सचिव मुंबई, मा.विभागीय आयुक्त नागपूर, मा.जिल्हाधिकारी गडचिरोली, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गडचिरोली , यांना निवेदन देऊन निलंबनाची कारवाही करण्याबाबत मागणी केली परंतु सदर निवेदनावर अद्यापही कारवाई न झाल्याने व उराडे यांची दादागिरि काही केल्या कमी न झाल्याने दुसऱ्याचे मार्फत माहिती अधिकार अर्ज/ मोघम, तत्यहीन तक्रार करणे हे कृत्य चालूच असल्याने संघटनेनी आंदोलनाची भूमिका स्वीकारली. त्या अनुषंगाने 12 हि तालुक्यात दिनांक 23 फेब्रुवारी पासून काम बंद आंदोलन उभारण्यात आले. आंदोलनात ग्रामपंचायत अधिकारी यांचे कडून कुठलेही शासनाचे कामे केली जाणार नाही. केवळ ग्रामपंचायतिची मूलभूत सुविधा पुरविणारी आवश्यक तीच कामे केली जातील. सदरचे निवेदन आज कुरखेडा तालुका शाखा युनियनने गट विकास अधिकारी धीरज पाटील, यांना सादर केले. निवेदन सादर करताना तालुका अध्यक्ष दिवाकर निंदेकार, उपाध्यक्ष गौतम गेडाम, सचिव लोमेश्वर किरणापुरे, जनरल कौशीलर नरेंद्र आंबोने, कोषाध्यक्ष योगेश टिकले, महिला उपाध्यक्ष माधुरी रामटेके, कार्याध्यक्ष लता डोंगरवार,कायदे सल्लागार निलेश जवंजाळकर,प्रसिद्धी प्रमुख दुर्योधन बारसागडे, संघटक विनोद धाईत, यशोदा पेंदोर, कल्पना राऊत, आरती भोयर, अंबादास राठोड, राजेश दोनाडकर, देवाशीस अंबादे, दिगंबर मिसार, अशोक प्रधान,योगाजी बन्सोड, देवानंद भोयर, प्रज्ञा फुलझेले, कुंदा बरडे तथा तालुक्यातील संपूर्ण 45 ही ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते. सहाय्यक गट विकास अधिकारी उराडे यांचेवर योग्य ती कारवाई न झाल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल असे तालुका अध्यक्ष निंदेकर यांनी सांगितले. निवेदनामध्ये संघटनेनी स्पष्ट उल्लेख केला आहें कि एक तर संबंधित दोषी सहाय्यक गट विकास अधिकारी यांना निलंबित करा किंवा जिल्ह्यातील संपूर्ण 400 हि ग्रामपंचायत अधिकारी यांना निलंबित करण्यात यावे.

### माजी आमदार डॉ. देवराव होळी यांची भाजपा महाराष्ट्र प्रदेश आदिवासी आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम**



देसाईगंज : माजी आमदार डॉ. देवराव होळी यांची भारतीय जनता पक्षच्या महाराष्ट्र प्रदेश आदिवासी आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या केंद्रीय व राज्य नेतृत्वाने त्यांच्या प्रभावी संघटनशक्तीची, आदिवासी समाजातील भक्कम पकडीची आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे. माजी आमदार डॉ. देवराव होळी हे यापूर्वी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. या पदावर असताना त्यांनी राज्यभर संघटन बळकटीसाठी व्यापक संपर्क मोहिमा राबवल्या, कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढवला आणि आदिवासी भागात पक्षाची मजबूत पायाभरणी केली. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक ठिकाणी संघटनात्मक रचना अधिक सक्षम करण्यात आली. ते सध्या राष्ट्रीय SC/ST विकास परिषदचे राष्ट्रीय महामंत्री म्हणूनही कार्यरत आहेत. तसेच आदिवासी समाजातील शिखर संघटना असलेल्या अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदच्या गडचिरोली जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी ते यशस्वीपणे सांभाळत आहेत. तसेच त्यांनी आपल्या समाज कार्याची सुरवात विध्यार्थी दशेपासूनच केली होती. शिक्षण घेत असतांना त्यांनी आदिवासी विध्यार्थी संघ व नंतर डॉ. झाल्यावर डॉक्टरांची संघटना असलेल्या मॅग्मा चे ते अध्यक्ष सुद्धा राहिलेले आहेत. त्यांनी आपल्या सामाजिक जीवनात आदिवासी समाजाच्या शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि हक्कांसाठी त्यांनी सातत्याने लढा दिला आहे. त्यांच्या ह्या कार्याची दखल घेत पक्षाने त्याना 2 वेळेस विधानसभाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली. व त्यांनी आपल्या 10 वर्षाच्या विधायकीच्या कार्यकाळात लोकहिताचे कार्य करून सर्व सामान्य नागरिकांच्या मनात आपला हक्काचा माणूस म्हणून ओळख निर्माण केली. यावेळी माजी आमदार डॉ. देवराव होळी यांनी आपल्या नियुक्तीचे श्रेय भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री व माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना दिले.

# सोनाळा पोलिसांची तत्पर कारवाई, ४२ हजारांचा हरवलेला मोबाईल दोन दिवसांत मालकाला परत

**विदर्भ केसरी प्रतिनिधी**

संग्रामपूर : सोनाळा पोलिसांनी दाखविलेल्या कार्यतत्परतेमुळे सुमारे ४२ हजार रुपये किमतीचा हरवलेला मोबाईल अवघ्या दोन दिवसांत शोधून मूळ मालकाकडे सुपूर्द करण्यात आला. आधुनिक तांत्रिक साधनांचा वापर आणि जलद तपास यामुळे हे यश मिळाल्याने नागरिकांमधून पोलिसांच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे. सोनाळा येथे स्थानिक अशरफ नगर येथील रहिवासी इबादउल्ला खान सनाउल्लाह खान यांचा व्हिव्हो कंपनीचा महागडा मोबाईल हरवल्यानंतर त्यांनी तातडीने पोलिसांत तक्रार दाखल केली होती. ठाणेदार संदीप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल कैलास सांगळे व विकास सावळे यांनी तांत्रिक तपासाची गती वाढवत अवघ्या दोन दिवसांत मोबाईलचा शोध घेतला. तपास पूर्ण झाल्यानंतर संबंधित मोबाईल रविवारी २२ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ठाणेदार संदीप काळे यांच्या हस्ते मूळ मालक इबादुल्ला खान यांच्याकडे विधिवत परत करण्यात आला. आपला हरवलेला मोबाईल सुरक्षित परत मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त करत सोनाळा पोलीस स्टेशनचे ठाणेदार संदीप काळे तसेच तपास पथकाचे मनापासून



आभार मानले. दरम्यान, नागरिकांच्या तक्रारींना प्राधान्य देत वेगवान व पारदर्शक कारवाई करणाऱ्या सोनाळा पोलिसांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. गुन्हे उघडकीस आणण्याबरोबरच सर्वसामान्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी पोलिस यंत्रणा सजग असल्याचे यामुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

> नागरिकांच्या तक्रारींना तात्काळ प्रतिसाद देणे हे पोलीस दलाचे कर्तव्य आहे. हरवलेल्या मोबाईल प्रकरणात आमच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या माध्यमातून जलद कारवाई केली आणि अवघ्या दोन दिवसांत मोबाईल शोधण्यात यश मिळवले. नागरिकांनी कोणतीही घटना घडल्यास विलंब न करता पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा. आम्ही नागरिकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर आहोत.
>
> **-संदीप काळे**, ठाणेदार, सोनाळा पो.स्टे.

> माझा ४२ हजार रुपये किमतीचा मोबाईल हरवल्याने मी खूप चिंतेत होतो. मात्र पोलिसांनी तातडीने कारवाई करून केवळ दोन दिवसांत माझा मोबाईल शोधून दिला. पोलीस बांधवांचे मी मनापासून आभार मानतो.
>
> **-इबादउल्ला खान**, मोबाईल मालक

## चंद्रपूर महाऔद्योगिक वीज केंद्रात मुख्य अभियंत्याच्या मनमानीविरोधात कंत्राटदारांचे बेमुदत उपोषण!

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : कुणाल गायकवाड**

चंद्रपूर: राज्यातील वीज निर्मितीचा क णा असलेल्या चंद्रपूर महाऔद्योगिक वी ज केंद्रात सध्या भ्रष्टाचाराचा आणि घ राणेशाहीचा अंधार पसरला आहे. मुख्य अभियंता विजय राठोड यांच्या मनमानी कारभाराने आणि पदाचा गैरवापर करून आपल्या पुतण्याला 'बॅकडोअर' एन्ट्री दिल्याने स्थानिक कंत्राटदारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या अन्यायाविरोधात कंत्राटदारांनी वीज केंद्राच्या मेजर गेटसमोर बेमुदत उपोषण सुरू केले असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मौनामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

नेमके प्रकरण काय? मुख्य अभियंता विजय राठोड यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करून पुतण्या विकी राठोड याची तांत्रिक सहाय्यक पदी व र्णी लावल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. ही नियुक्ती करताना पारदर्शकतेचे सर्व नियम धाब्यावर बसवण्यात आल्याचा आरोप होत आहे. सामाजिक कार्यकर्ते सुनील दहेगावकर यांनी या नियुक्तीच्या चौकशीसाठी वरिष्ठ पातळीवर वारंवार पुरावे सादर केले, मात्र अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.

उपोषणकर्त्यांच्या प्रमुख मागण्या:



स्थानिक कंत्राटदारांनी शुक्रवारी स का ळपासूनच आंदोलनाचे हत्यार उपसले असून त्यांच्या मा गण्या खालीलप्रमाणे आहेत: विकी राठोड याच्या तांत्रिक सहाय्यक प दा व रील नियुक्तीची सखोल आ णि निष्पक्ष चौकशी व्हावी. म र्जीतील कंत्राटदारांना फायदा पो होचवण्यासाठी तयार केलेले DP R (कामकाजाचे प्रस्ताव) तात्काळ रद्द करण्यात यावेत. का माच्या निविदा आणि पात्रतेच्या नि कषांमध्ये झालेली छेडछाड थां ब वून त्याची चौकशी व्हावी.

व रिष्ठांचे 'अभय' की राज कीय वरदहस्त? एकीकडे पुराव्यानिशी तक्रारी होऊनही कार वा ई शून्य आहे, तर दुसरीकडे राठोड यांच्यावर वरिष्ठ अधिकारी मेहेरबान का? अशी चर्चा वीज केंद्राच्या वर्तु ळा त रंगली आहे. आंदोलकांचा आरोप आहे की, राठोड यांना राजकीय ने त्यांचे आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पाठबळ असल्यामुळेच त्यांची चौकशी लांबणीवर टाकली जात आहे.

> ■ "आम्ही सर्व पुराव्यानिशी तक्रारी केल्या आहेत, तरीही साधी चौकशी होत नाही. याचा स्पष्ट अर्थ असा की विजय राठोड यांना वरून अभय मिळत आहे. जोपर्यंत आम्हाला न्याय मिळत नाही आणि भ्रष्ट नियुक्त्या रद्द होत नाहीत, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरूच राहील."
>
> **स्थानिक कंत्राटदार व उपोषणकर्ते**
>
> ■ एकीकडे स्थानिक बेरोजगारांना रोजगारासाठी वणवण करावी लागत असताना, दुसरीकडे मुख्य अभियंता पदावरील व्यक्ती आपल्याच नातेवाईकाना व जवळच्या कंत्राटदारअचे उखळ पांढरे करत असेल, तर प्रशासकीय शिस्तीचा बोजवारा उडाला आहे असेच म्हणावे लागेल. आता ऊर्जामंत्री आणि वीज मंडळाचे वरिष्ठ संचालक याकडे लक्ष देऊन कारवाई करणार की ही 'भ्रष्टाचाराची वीज' अशीच तेवत राहणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राजाराम येथे शहीद वीर दिनकर अर्का यांच्या स्मरणार्थ चौकाचे नामकरण सोहळा

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : राजेश कुमरे**

अहेरी : गडचिरोली जिल्यातील अहेरी तालुक्यातील राजाराम खांदला येथील देशासाठी प्राणांची आहुती देणारे शूरवीर जवान शहीद दिनकर बोदय्या अर्का यांनी दिनांक 22 फेब्रुवारी 2005 रोजी भामरागड तालुका धोडराज येते शहीद झाले होते. त्यांच्या शौर्याला आणि बलिदानाला अभिवादन करण्यासाठी आज दिनांक 22 फेब्रुवारी 2026 रोजी राजाराम येथे “शहीद दिनकर बी. अर्का चौक” असे नामकरण करून त्यांना अभिवादन करण्यात आले होते. या प्रसंगी ग्रामस्थ, स्थानिक पदाधिकारी, माजी सैनिक तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चौकात शहीद दिनकर अर्का यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. उपस्थितांनी “भारत माता की जय” आणि “शहीद दिनकर अर्का अमर रहें” अशा जय घोषणांनी परिसर दणाणून सोडला. वक्त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, सुरवीर जवान शहीद दिनकर अर्का यांनी मातृभूमीच्या रक्षणासाठी सर्वोच्च बलिदान दिले असून त्यांचे शौर्य आणि त्याग येणाऱ्या पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. त्यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेला हा चौक म्हणजे गावकऱ्यांकडून व्यक्त करण्यात आलेली कृतज्ञतेची भावना आहे. राजाराम गावात उभारण्यात आलेला “शहीद दिनकर बी.अर्का चौक” हा पुढील पिढ्यांना देशभक्तीची प्रेरणा देणारा स्मारक ठरणार आहे हे विशेष.. सदर फलकाचे अनावरण शहीद दिनकर अर्का यांचे वडील व आई मैनाबाई बोदया अर्का पत्नी शारदा दिनकर अर्का, मुलगा प्रीतम व प्रथम व बहीण मंजुळा पेंदाम, पंचफुला सरकार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विशेष अतिथी म्हणून पोलीस निरीक्षक अवारे साहेब, उपसरपंच रोशन कंबगोणीवार, ग्रा. पं सदस्य, रमेश पोरतेट, विनायक आलाम, संजावली अरगेला,यशोदा आत्राम, शाळा व्य. स अध्यक्ष अरविंद परकीवार, त. मु. अध्यक्ष मुता पोरतेट, संजय पोरतेट, दिपक आलाम, माजी सदस्या सपना मारकवार, अनिता आत्राम, प्रेमीला मडावी,जितेंद्र गड्डमवार जयराम दुर्गे, गोपाल चंदनखेळे, मनोज आकदर,राकेश सडमेक, सुरेश मोतकुरवार, राहुल कंबगोणीवार, महादेव आत्राम,भगवान तलांडी, आदी उपस्थित होते. आयोजन समितीचे भास्कर तलांडे माजी सभापती अहेरी, विनोद सिडाम, दिपक अर्का मनोज सिडाम, शंकर सिडाम कपिल सिडाम, दिपक आत्राम, सुरज तलांडी, संकील सिडाम, अरविंद आत्राम, प्रवीण अर्का, प्रकाश अर्का, संजय अर्का, सखाराम अर्का,जीवन अर्का, समय्या आत्राम, रोहित अर्का विवेक सिडाम,अर्का, सतीश सडमेक, धर्मराव आत्राम, भगवान सिडाम,त्रिशुल अर्का,मधुकर आत्राम, स्वप्ननिल अर्का, महेश निष्ठारी, देशू तोरेम, बंडू तोरेम, शंकर गोंगले, तिरुपती दुर्गे, पवन तलांडे दिवकार आत्राम, सुनील बोडगेलवार,सदशिव गोंगले,राजेश दुर्गे,रोहित आत्राम,मीना आत्राम, शेवन्ता आत्राम, समक्का सिडाम, आशा सिडाम, अर्चना सिडाम, अंजली सिडाम, वर्षा अर्का, मंजुळा अर्का, रसिका बेबी अर्का, वनिता अर्का, पुष्पा अर्का, छाया अर्का, तुलशी सिडाम, स्वाती अर्का, मैनावती सिडाम, मंगला सिडाम,आदी उपस्थित होते.



## ‘एपीके फाईल’ पाठवून साडेसहा लाखांची फसवणूक

पुणे : वाहतूक नियमभंगाचे चलन, तसेच बँकेच्या नावे बनावट कागदपत्रे एपीके फाईल पाठवून सायबर चोरट्यांनी दोघांची साडेसहा लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध विश्रांतवाडी आणि मुंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विश्रांतवाडी भागातील एका तक्रारदाराची सायबर चोरट्यांनी प्रादेशिक परिवहन विभागाकडून (आरटीओ) करण्यात आलेल्या कारवाईचे बनावट दंडात्मक चलन पाठवून तीन लाख ६४ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एकाने विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. सायबर चोरट्यांनी गेल्या महिन्यात तीन जानेवारी रोजी दंडात्मक कारवाईचे बनावट चलन तक्रारदाराला पाठविले होते. हे चलन एपीके फाईलच्या माध्यमातून पाठविण्यात आले होते. ही फाईल उघडताच चोरट्यांनी त्यांच्या बँक खात्यातून तीन लाख ६४ हजार रुपयांची रोकड स्वत:च्या खात्यात वळविली. फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांनी नुकतीच पोलिसांकडे तक्रा दिली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक राऊत तपास करत आहेत.

# कॉँग्रेस पक्षाच्या साखळी उपोषणाला आले यश

## उपोषनाच्या पहिल्याच दिवशी टेंडर प्रक्रिया पूर्ण

**विदर्भ केसरी प्रतिनिधी : विजय निखाते**

पुसद सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत विकास कामाच्या प्रक्रिये निविधा प्रक्रियेत आपल्या मर्जीतील कणत्राटदारणा काम देण्याच्या उद्देशाने निविदा प्रक्रियेत मोठा आणा गोंदी कारभार सुरु आहे निविधा सादर होऊन चार चार पाच पाच महिने उलटून निविदा उघडले जात नाही. कंत्रात दरांनी निविदा प्रक्रियेत भाग घेऊनए यासाठी दबाव आणल्या जाते आणि दबावाला न जुमानता निविदा सादर केल्यास त्या निविदा कंत्राट दाराणी परत घ्यावी विना कारण कागद पत्राची मागणी करणे अशे एक ना अनेक प्रकार चे प्रयत्न करून निविदा आपल्या मर्जीतील कंत्रातदाराला काम




देणे बाबतच्या घटना घडीत आहे. शासकीय विश्राम गृह पुसदचे नवीन बांधकाम बाबतची निविदा पाच महिन्या पूर्वी पासून सादर झालेली होती परंतु आपल्या मर्जीतील कंत्रात दाराला सदर निविदा देण्याचा प्रयत्नत त्या उघडल्या जात नव्हत्या म्हणून विकासकामे ताबडतोब व्हावी, निविदा प्रक्रियेत स्पर्धा कायम रहवी या साठी सादर झालेल्या निविदा ताबडतोब उघडण्यात याव्या अशे निवेदन पुसद कॉँग्रेस कमेटी तर्फे दि.27 जान्वारी ला देण्यात आले होते त्या निवेदना नुसार फेब्रुवारीच्या दुसऱ्या आढवड्यात काही निविदा उघडण्यात आल्या परंतु मुख्य निविदा विश्रामगृह चे नवीन बांधकामचे निविदा उघडण्यात आली नाही, म्हणून निवेदना द्वारे साखळी उपोषण करण्याची सूचना पक्षा द्वारे देण्यात आली त्या नुसार दि 23 फेब्रुवारी रोजी पासून साखळी उपोषणास सुरवात करण्यात आली परंतु निवेदनाची / आंदोलनाची त्वरित दाखल घेत 23 तारखेच्याच सायं.4 वाजता निविदा उघडण्याची प्रक्रिया पार पाडली आहे. तशा प्रकारचा पत्र सार्वजनिक बांधकाम विभागा उपाभियंता यांनी दिले म्हणून सुरु असलेलं साखळी उपोषण स्थगित करण्यात आले. निविदा प्रक्रिया पार पाडली असली तरीही मर्जीतील कंत्रात दाराला काम देण्याच्या उद्देशाने या निवेदन प्रक्रियेत खूप आणगोंदी झालेली आहे ते कायदेशीर बाबीने केलेली आहे. दोन दोन, तीन तीन वेळा त्रुटी पत्र दिले गेले आहे. मोठं मोठे कंत्रात दारांनी निविदा प्रक्रियेत भाग घेतला आहे ज्यांनी कोट्यावदि रुपयाचे काम केलेली आहे व आजही करत आहे कामात्रात दारणा अपात्र ठरवन्याचे काम या अधिकाऱ्यांनी केलेले आहे आणि आजचे अपात्र असतील तर दोन चार महिन्या पूर्वी कसे पात्र होते ही बाब तपासावी लागेल या निविदा प्रक्रियेत सर्व कागद पत्राची पाहणी करून आवश्यक असल्यास चुकीची कार्यव्हावी करणाऱ्या अधिकाऱ्यावर न्यायालाईन कार्यवाही करण्यात येईल. आज हा साखळी उपोषण तूर्तास स्थगित केलं असले तरी खऱ्या अर्थाने भ्रष्ट कारभार रोखण्याची ही सुरवात आहे ही लढाई थांबणार नाही शसनाच्या द्वारे विकास निधी मधून शहरराचा व तालुक्याचा विकास झाला पाहिजे त्या ऐवजी सत्ताधारी आणि अधिकारी स्वतः:च विकास करीत आहे हे होऊ देणार नाही अशी गव्हाही देतो असे साखळी उपोषण करते कॉँग्रेस प्रदेश महासचिव डॉ मोहम्मद नदीम यांनी स्पष्ट केले. सदर साखळी उपोषण सांगता करते वेळी मंडपात उपोशन करते कॉँग्रेस शहरअध्यक्ष झिया शेख तर कार्याध्यक्ष ज्ञानदीप कांबळे यांना डॉ मोहम्मद नदीम यांच्या हस्ते शरबत पाजून उपोषणाची सांगता केली या वेळी उपोषण मंडपात प्रदेश अल्पसंख्यायक महासचिक सय्यद इस्ती्यक, तहेसीन खान, नगरसेवक जब्बार लाखे, फिरोज खान, प्रकाश नेमायते, आहेफाज खान, शहर उपाध्यक्ष मोहमद जुनेद, राजेश कांबळे, चेतन कंबळे, प्रशांत जमगडे उपस्थिती होते


## महा. राज्य ग्रा. प. अधिकारी युनियन डीएनए (136 ) तालुका गडचिरोली यांच्या वतीने गटविकास अधिकारी यांना निवेदन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

गडचिरोली : गटविकास अधिकारी पंचायत समिती गडचिरोली यांना दिनांक 23/02/2026 पासून संपूर्ण तालुक्यातील ग्रामपंचायतीचे प्राथमिक मूलभूत कामकाज वगळता इतर संपूर्ण कामकाज बंद करण्यात येत आहे. कोणतीही माहिती, अहवाल सादर करणार नाही. तसेच तालुका/जिल्हा स्तरावरील सर्व सभेवर बहिष्कार राहील. याबाबत महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन DNE136 तालुका शाखा गडचिरोली तर्फे निवेदन देण्यात आले.




## संक्षिप्त




### अतिदुर्गम भागातील बाळाला तातडीची मदत ; वेळीच उपचार मिळाल्याने प्रकृती स्थिर..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

भामरागड : गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागात राहणाऱ्या चंद्रकला वनेश कोंडापे यांच्या छोट्याशा बाळाची प्रकृती अचानक गंभीर झाल्याची घटना सोमवारी (२३ फेब्रुवारी २०२६) रात्री उघडकीस आली. बाळाची प्रकृती चिंताजनक असल्याने तातडीने चंद्रपूर येथील रुग्णालयात दाखल करणे आवश्यक असल्याची माहिती मिळताच शासकीय वैद्यकीय मदत कक्षाचे जिल्हा प्रमुख मनिकंठ प्रमोदजी गादेवार यांनी तत्काळ दखल घेत आर्थिक मदत उपलब्ध करून दिली. या प्रकरणी अहेरी विधानसभा प्रमुख (शि. वै. मदत कक्ष) प्रकाशजी गड्डुलवार यांच्या सहकार्याने अहेरी येथील रुग्णालयातून रुग्णवाहीकेद्वारे बाळ व त्याच्या आईला चंद्रपूर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. दुर्गम भागातून तातडीने वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याने संभाव्य धोका टळला. वेळीच उपचार मिळाल्यामुळे बाळाची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली. या तत्पर कार्यवाहीबद्दल मा. मनिकंठ प्रमोदजी गादेवार आणि मा. प्रकाशजी गड्डुलवार यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. अतिदुर्गम भागातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर मदत मिळणे किती महत्त्वाचे आहे, याचे हे उदाहरण ठरले आहे.



### सिरोंचा तालुक्यातील जप्राबाद ग्रामपंचायतीच्या निधींची सखोल चौकशीची मागणी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : लक्ष्मीनारायण आडेटी

सिरोंचा : सिरोंचा तालुक्यातील जप्राबाद ग्रामपंचायतीत सन 2020 ते 2025 या कालावधीत विविध शासकीय योजनांतर्गत प्राप्त झालेल्या निधींच्या वापराबाबत सखोल चौकशी करून प्रत्यक्ष स्थळी पंचनामा करण्याची मागणी भाकपा सिरोंचा तालुका सचिव रवि बारसागंडी यांनी केली आहे. यासंदर्भात मा. गटविकास अधिकारी (BDO), पंचायत समिती सिरोंचा यांच्या मार्फत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), जिल्हा परिषद गडचिरोली यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. निवेदनानुसार, ग्रामपंचायत जप्राबाद येथे दलित वस्ती सुधार निधी, कोरोना विशेष निधी, ग्रामनिधी (14 वा व 15 वा वित्त आयोग), घनकचरा व्यवस्थापन निधी, तलाव विकास निधी, घरकुल योजना, कोंडवाना क्षेत्र विकास निधी तसेच इतर विविध विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाला आहे. मात्र संबंधित निधीची अचूक रक्कम, मंजूर कामे व प्रत्यक्ष खर्च याबाबत ग्रामस्थांना स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. निवेदनात केवळ कागदपत्रांवर आधारित चौकशी न करता संबंधित अधिकारी, अभियंते व ग्रामस्थांच्या उपस्थितीत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून मुक्काम पंचनामा करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रत्येक योजनेचा निधी, खर्च, प्रलंबित कामे व सद्यस्थिती याबाबत सविस्तर लेखी अहवाल देण्याची विनंती करण्यात आली आहे. अनियमितता आढळल्यास संबंधित जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. 15 दिवसांच्या आत कार्यवाही करण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. या प्रकरणी प्रशासनाकडून काय भूमिका घेतली जाते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### अंगणवाडी शौचालयाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : लक्ष्मीनारायण आडेटी

सिरोंचा : तालुक्यातील रंगय्यापल्ली येथील अंगणवाडी केंद्र क्र. १ मधील शौचालयाच्या दुरवस्थेबाबत १६ फेब्रुवारी रोजी गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन देण्यात आले होते. मात्र, तब्बल काही दिवस उलटूनही संबंधित प्रकरणी कोणतीही प्रत्यक्ष चौकशी, पाहणी किंवा अधिकृत माहिती देण्यात आलेली नसल्याने ग्रामस्थांत नाराजी व्यक्त होत आहे. निवेदनात शौचालयाला दरवाजा नसणे, सीट बसवलेली नसणे तसेच बांधकाम अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे ते वापरासाठी अयोग्य असल्याचे नमूद करण्यात आले होते. लहान मुलांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याने तात्काळ कारवाईची मागणी करण्यात आली होती. भारत सरकारच्या स्वच्छता अभियानाच्या तरतुदीनुसार व महिला व बालविकास विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंगणवाडी केंद्रात कार्यरत शौचालय असणे आवश्यक आहे. सार्वजनिक निधीतून बांधकाम होऊनही सुविधा प्रत्यक्षात उपलब्ध नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला होता. निवेदनात संबंधित कामाची सखोल चौकशी, मंजूर निधी व खर्चाचा तपशील जाहीर करणे, जबाबदारांवर कारवाई करणे व अपूर्ण काम तातडीने पूर्ण करणे अशा मागण्या करण्यात आल्या होत्या. तथापि, आजपर्यंत कोणतीही अधिकृत माहिती किंवा कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.





### सपना पोरेड्डीवार यांचे निधन..!




गडचिरोली : येथील अनिल पोरेड्डीवार यांच्या पत्नी सपना पोरेड्डीवार यांचे आज २४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे कुटुंबियांसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पती, मुलगा व आप्तपरिवार असा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी उद्या सकाळी १० वाजता काठानी नदीवर करण्यात येणार आहे.

# गुरनोली येथील सती नदी पात्रातून अवैध वाळू उपसा

## दिल्लीतील कंत्राटदाराने शासनाचा लाखोंचा महसूल बुडवला, कुरखेडा तालुक्यात अवैध वाळू माफियांचा उच्छाद

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

कुरखेडा : नान्ही वाळू घाट प्रकरणात १.४६ कोटींचा दंड ठोठावल्यानंतर आता गुरनोली गावालगत सती नदीतून अवैध उत्खनन; एकलव्य निवासी शाळेच्या बांधकामासाठी शासकीय कामातच वापर सुरू असल्याने महसूल विभागाच्या प्रति जनमानसात चिळ निर्माण झाली असून सदर व्यक्तीवर कारवाही करण्यात यावी. गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यातील नुकतेच नान्ही येथील अवैध वाळू उपसा प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांनी १.४६ कोटी रुपयांचा दंड आकारून कारवाई केली होती. त्या प्रकरणाची धूळ अजून खाली बसलेली नाही, तोच आता कुरखेडा तालुक्यातील गुरनोली येथे सती नदी पात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उत्खनन सुरू असल्याचे गंभीर प्रकार समोर आला आहे. प्राप्त माहितीनुसार, दिल्ली येथील 'द युनिक एंटरप्राइजेस'** नावाच्या बांधकाम कंत्राटदाराने शासनाकडून कोणतीही वाळू उत्खनन परवानगी किंवा महसूल अदा न करता सती नदीच्या पात्रातून अवैध मार्गाने मोठ्या प्रमाणात वाळू उपसा केला आहे. यामुळे शासनाचा लाखों रुपयांचा महसूल बुडवला गेल्याचे बोलले जात आहे. हे अवैध उत्खनन गेवर्धा ग्रामपंचायत क्षेत्रातील गुरनोली गावालगत सुरू असलेल्या एकलव्य निवासी शाळेच्या बांधकामासाठी केले गेले असून, उपसलेली वाळू थेट शासकीय बांधकामात बेधुंदपणे वापरली जात आहे. मुख्य मार्गालगत उघड्यावर ठेवलेल्या या अवैध वाळू साठ्यावर महसूल अधिकाऱ्यांची नजर पडू नये, हे आश्चर्यकारक आहे. स्थानिक सूत्रांनुसार, तहसीलदार, नायब तहसीलदार व महसूल कर्मचाऱ्यांना वरिष्ठांकडून दुर्लक्ष करण्याची सूचना असल्याने हे प्रकार सुरू आहेत. स्थानिक महसूल अधिकाऱ्यांच्या आशीर्वादानेच कंत्राटदाराला इतकी हिंमत झाली असल्याची विश्वसनीय माहिती आहे. नान्ही प्रकरणात फक्त कंत्राटदारावर दंड आकारला गेला, पण तहसीलदार व इतर अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई झाली नाही. यामुळे कंत्राटदारांना पुन्हा हातमिळवणी करून अवैध उपसा करण्याची संधी मिळाली असल्याचे दिसते. १०० कोटी रुपयांच्या प्रस्तावित बांधकामासाठी अवैध वाळू वापरण्याची हिंमत कंत्राटदार तेव्हाच करू शकतो, जेव्हा स्थानिक अधिकाऱ्यांसोबत संगनमत असते, असे स्थानिक नागरिकांचे मत आहे. स्थानिक नागरिकांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन कंत्राटदारावर कायदेशीर कारवाई, दंड वसुली आणि वाळू धोरण २०२५ नुसार फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने या अवैध उत्खननावर कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.






# चामोर्शीतील सुपीक जमिनी अधिग्रहणास काँग्रेसचा विरोध

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उध्वस्त करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोलीचे पालकमंत्री पद स्वीकारले का ? - काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांचा सवाल..!

### पालकमंत्री पदावरूनही सवाल

■ यावेळी बोलताना ब्राह्मणवाडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वीकारण्यामागे शेतकऱ्यांच्या हितासाठी नव्हे, तर जिल्ह्यातील शेतकरी उद्ध्वस्त करणारे निर्णय रेटून नेण्यासाठीच हे पद स्वीकारले आहे काय, असा गंभीर सवाल उपस्थित केला. "जर सरकार शेतकऱ्यांच्या बाजूने असते, तर सुपीक शेती व सिंचनाखालील जमिनी उद्योगपतींसाठी बळी दिल्या गेल्या नसत्या," असेही ते म्हणाले.







▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : विनोद सेलोटे

चामोर्शी : महाराष्ट्र सरकारने उद्योग व विकासाच्या नावाखाली गडचिरोली जिल्हातील चामोर्शी तालुका येथे सिंचनाखालील व बारमाही पीक देणाऱ्या सुपीक शेतीजमिनी अधिग्रहित करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, या निर्णयामुळे शेतकरी, कष्टकरी तसेच संपूर्ण गावांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. हा निर्णय जनहितविरोधी असल्याचा आरोप गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून केला आहे. या संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत बोलतांना महेंद्र ब्राह्मणवाडे यांनी शासनाच्या भूमिकेवर तीव्र टीका केली.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर महसुली व वनजमिनी उपलब्ध असतांना, केवळ चामोर्शी तालुक्यातील नदीकाठच्या, सिंचनाखालील व अत्यंत सुपीक जमिनींचीच निवड का करण्यात आली, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. ही जमीन शेतीची असून हजारो शेतकरी कुटुंबांची उपजीविका त्यावर अवलंबून आहे. मात्र उद्योगपतींच्या फायद्यासाठी शेतकऱ्यांचे नुकसान केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. भेंडाळा परिसरातील १४ गावांतील सुमारे ९ हजार एकर जमीन अधिग्रहण हा सातवा टप्पा असल्याचे सांगितले जात आहे. मात्र यापूर्वीचे सहा टप्पे कोणते व पुढील टप्प्यांची माहिती सरकार जाहीर का करत नाही ?, असा सवाल काँग्रेसकडून करण्यात आला आहे. संपूर्ण तालुक्यात एमआयडीसी उभारण्याची योजना असतांना, शेतकऱ्यांचा एकत्रित विरोध टाळण्यासाठी टप्प्याटप्प्याने जमीन अधिग्रहण केले जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

जमीन गेल्यानंतर प्रत्यक्षात किती स्थानिक युवकांना रोजगार मिळणार आहे, वृद्ध शेतकरी, महिला व कुटुंबांच्या उपजीविकेचे काय होणार, याबाबत शासनाकडे कोणतीही ठोस योजना नसल्याचे ब्राह्मणवाडे यांनी सांगितले. स्थानिकांना रोजगार दिल्याची कोणतीही अधिकृत आकडेवारीही सरकारकडे नसल्याचे त्यांनी नमूद केले. तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्चुन उभारलेला चिचडोह सिंचन प्रकल्प नेमका कुणासाठी, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. शेतकऱ्यांसाठी उभारलेला प्रकल्प उद्योगांसाठी वापरला जात असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. शासन आदेशात ही जमीन खाजगी उद्योगपतींना दिली जाणार असल्याचा स्पष्ट उल्लेख असताना, कमी दरात जमीन अधिग्रहित करून एमआयडीसी मार्फत देण्याऐवजी शेतकरी व उद्योगपती यांच्यात थेट चर्चा का घडवून आणली नाही, असा सवालही यावेळी उपस्थित करण्यात आला.

# महसूल सेवक (कोतवाल) उपाशी, सरकार तुपाशी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : फुलचंद वाघाडे

कुरखेडा : विदर्भ महसूल सेवक संघटनेच्या माध्यमातून संविधान चौक नागपूर येथे ३२ दिवस आंदोलन व त्यात ११ दिवस अन्नत्याग आंदोलन केले होते, तेव्हा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे आमच्या आंदोलन स्थळी येऊन, आम्हाला वेतन श्रेणी मिळवून देतो म्हणून शब्द दिला व आमचे आंदोलन तात्पुरते स्थगित केले, आज त्या घटनेला जवळपास ४ ते ५ महिने उलटले परंतु आजतागायत आम्ही जेव्हा जेव्हा भेट घेतली तेव्हा तेव्हा ते हो मला तुमचे काम करायचे आहे, तुम्ही निश्चित रहा असेच आश्वासित करीत आले. परंतु आता अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले आहे. तरी आपण दिलेल्या शब्दाला जागून आमच्या हक्काच्या वेतनश्रेणी संदर्भात योग्य तो निर्णय घेऊन आम्हाला न्याय द्यावा. आज आम्ही महसूल सेवक (कोतवाल) हे महसूल विभागाचे शेवटचे घटक असुन आम्ही ई पिक पाहणी, बुथ लेवल आफिसर, रेती अवैध उत्खनन, चौकीदार, पिक पंचनामे, अतीव्रुष्टी मधे मदत ईत्यादी कामे ईमाणे इतबारे करतो, आणी एवढे काम करुण सूद्धा सरकारणे आमची दखल घेतली नाही तर पुन्हा नव्या जोमाने आम्ही तिव्र स्वरुपात काम बंद व पुनश्च अन्नत्याग आंदोलन करण्यास सरकारणे भाग पाडु नये. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामधे आमच्या हक्काच्या वेतनश्रेणी संदर्भात निर्णय घ्यावा असे आवाहन विदर्भ महसूल सेवक संघटना अध्यक्ष रवींद्र बोदेले, राज्य उपाध्यक्ष अमरावती विभाग योगेश सेडमाके, राज्य उपाध्यक्ष नागपूर विभाग गोपाल ठवरे, कार्याध्यक्ष मंगेश जांभुळकर, सरचिटणीस दिपक रेवतकर, उत्तम पाचभाई, अमोल पाचभाई, अशोक भोसकर, स्वराज्य जिलठे, दया वंजारी, कालिदास गेडाम, महादेव शिवनकर, दामोदर नाकाडे, ईत्यादी पदाधिकारी यांनी केली आहे.

# नवकल्पना आणि बहुविषयक धोरण विकसित भारत २०४७ संकल्पपुर्तीसाठी आवश्यक : डॉ श्रीराम कावळे

## आदर्श महाविद्यालयात बहुविषयक राष्ट्रीय अधिवेशनाचे यशस्वी आयोजन

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी : प्रल्हाद मेश्राम




देसाईगंज : उच्च शिक्षण हे मानवी विकासाचे मूलभूत केंद्र आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे मुख्यत्वे बहुविषयक शिक्षण, सॉफ्ट कॉम्पोनेंट्स आणि संशोधनाला प्राधान्य देणारे आहे. कृषी संशोधन, नैसर्गिक शेती आणि अन्नाच्या गुणवत्तेबाबत जागरूकता निर्माण व्हावी, शिक्षण क्षेत्रातील नवकल्पना आणि बहुविषयक दृष्टिकोनाच्या माध्यमातून भारत २०४७ पर्यंत "विकसित भारत" घडविण्याचे उद्दिष्ट साध्य करू शकतो," असे प्रभावी मार्गदर्शन डॉ श्रीराम कावळे, प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी केले. आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आयोजित "बहुविषयक संशोधनातील नवी दालने: कल आणि आव्हाने" या एक दिवसीय बहुविषयक राष्ट्रीय अधिवेशनाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. जागतिक स्तरावर शिक्षण क्षेत्रात 'विश्वगुरू' होण्याची क्षमता देशात असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. नू शि प्र मंडळाचे सचिव मान. मोतीलाल कुकरेजा यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या उद्घाटनीय कार्यक्रमाला संस्था सदस्य तथा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ शंकर कुकरेजा, महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य डॉ श्रीराम गहाणे, डॉ. निहार बोदेले, अधिवेशन संयोजक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख हे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. डॉ शंकर कुकरेजा यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्व विशद करून उच्च शिक्षण विद्यार्थी केंद्री व संशोधनाला चालना देणारे असावे असे मत मांडले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात मा मोतीलाल कुकरेजा यांनी प्रभावी उपक्रमांच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण बहुविषयक शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी महाविद्यालाचे अभिनंदन केले. डॉ श्रीराम गहाणे यांनी पाहुण्यांचा परिचय करून देत बहुविषयक राष्ट्रीय अधिवेशन आयोजनाच्या उद्देशावर भाष्य केले. या अधिवेशनात सहभागी प्राध्यापक-संशोधकांचे संशोधन लेख 'जिनीअस' पिअर रिव्युवड आंतराष्ट्रीय बहुविषयक अर्धवार्षिक संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध करण्यात आले त्या पत्रिकेचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करणयात आले.

या परिषदेला रा तू म नागपूर विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागातील प्राध्यापक स्मिता आचार्य ह्या बीजभाषक व तिसऱ्या सत्राच्या तज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. रा तू म नागपूर विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ समित माहुरे व रा तू म नागपूर विद्यापीठातील ग्रंथालय शास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ शालिनी लिहितकर हे अनुक्रमे पहिल्या व दुसऱ्या सत्रातील तज्ञ मार्गदर्शक होते. संशोधन पत्र सादरीकरण सत्राचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य डॉ श्रीराम गहाणे होते.

हे राष्ट्रीय अधिवेशन प्रत्यक्ष व आभासी अशा दोन्ही पद्धतीने चालले. आभासी पद्धतीने झालेल्या संशोधन पत्र सादरीकरण सत्राचे अध्यक्ष म्हणून डॉ. डी. बी. फुलझेले, इंग्रजी विभाग, आंबेडकर महाविद्यालय, ब्रह्मपुरी व डॉ. वर्षा चंदनशिवे, राज्यशास्त्र विभाग, ने. ही. महाविद्यालय, ब्रम्हपुरी ह्या होत्या. दोन्ही पद्धतीमध्ये देशभरातून शेकडो प्राध्यापक सहभागी झाले. 130 प्राध्यापक-संशोधकांचे संशोधन लेख जिनीअस' पिअर रिव्युवड आंतराष्ट्रीय बहुविषयक अर्धवार्षिक संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध प्रकाशीत करण्यात आले व पन्नासहून अधिक प्राध्यापक-संशोधकांनी संशोधन पत्रांचे वाचन केले.

अधिवेशनाचा समारोपीय सत्र डॉ श्रीराम गहाणे यांचे अध्यक्षतेखाली प्रा डॉ हितेंद्र धोटे, समन्वयक महा. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, व डॉ. निहार बोदेले, अधिवेशन संयोजक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख यांचे उपस्थितीत संपन्न झाला. उद्घाटन सभारंभ, व अन्य तांत्रिक सत्रांचे सुत्रसंचालन प्रा. तेजस आत्राम, प्रा अमोल बोरकर, प्रा शिफाना शेख, प्रा प्रियंका ठाकरे, डॉ वैशाली बोरकर, प्रा. शिवानी मिसार, प्रा. जितेंद्र राऊत, प्रा. हर्षा बगमारे, प्रा. शितल कोसे यांनी केले. आभार अधिवेशन आयोजन समन्वयक डॉ. निहार बोदेले यांनी मानलेत. अधिवेशन यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातीन सर्व प्राध्यापक वृंदांनी मेहनत घेतली..




# पाहिजेत

'दैनिक विदर्भ केसरी' या अग्रगण्य मराठी वृत्तपत्राचा विस्तार संपूर्ण विदर्भात होत आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्यासाठी आणि जनसामान्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्हाला विदर्भातील प्रत्येक जिल्हा आणि तालुका पातळीवर उत्साही, कल्पक आणि अनुभवी 'बातमीदार/प्रतिनिधी' नियुक्त करणे आहे.




## खा... आणि त्यांच्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक ता... ी १ प्रतिनिधीची नियुक्त करणे आहे

### न...
जि...
- नागपूर शहर,
- काटोल, नरखेड,
- सावनेर, रामटेक,
- हिंगणा, उमरेड इ.


### अमरावती
जिल्हा प्रतिनिधी
- अमरावती शहर, अंजनगाव सुर्जी,
- चांदूर बाजार, मोर्शी
- धामणगाव रेल्वे, चांदूर रेल्वे,
- मोर्शी, तिवसा, वरूड, इतर

### अकोला
जिल्हा प्रतिनिधी
- अकोला शहर, अकोट,
- बाळापूर, पातूर,
- तेल्हारा, इ.

### यवतमाळ
जिल्हा प्रतिनिधी
- यवतमाळ शहर दिग्रस,
- दारव्हा,वणी,
- पांढरकवडा, आर्णी इ.

### बुलढाणा
जिल्हा प्रतिनिधी
- बुलढाणा, चिखली,
- खामगाव, शेगाव,
- मलकापूर, देऊळगाव
- राजा इ.

### चंद्रपूर
- चंद्रपूर शहर,
- बल्लारपूर,
- वरोरा, भद्रावती,
- राजुरा, ब्रह्मपुरी



### आकर्षक वेतन
संगणक चालक
पेज डिझायनर.
- कोरल
- फोटोशॉप
- इनडिझाईन
- क्वॉर्क
- ज्ञान आवश्यक

- वर्धा जिल्हा वर्धा शहर, हिंगणघाट, आर्वी, देवळी, सेलू, कारंजा इ.
- गोंदिया गोंदिया, तिरोडा, अर्जुनी मोरगाव, देवरी, आमगाव इ.
- भंडारा भंडारा, तुमसर, पवनी, साकोली, लाखांदूर इ.
- गडचिरोली जिल्हा प्रतिनिधी गडचिरोली, अहेरी, चामोर्शी, देसाईगंज (वडसा), एटापल्ली इ.
- वाशिम शहर कारंजा लाड, रिसोड, मालेगाव, मानोरा,

वरील तालुका जिल्हा प्रतिनिधीसाठी इच्छुक असणाऱ्यानी आपला बायोडाटा (Biodata) आणि आधार कार्डची प्रत खालील व्हॉट्सअँप नंबरवर पाठवावी किंवा संपर्क साधावा.

**कुणाल गायकवाड (जिल्हा प्रतिनिधी) मो.9579367474**
**अमोल कंटाळे (संपादक ) मो 9975532291**